संत निरंकारी

मराठी

जून २००९



नजराणा हा स्मितहास्याचा
करीतसे वर्षाव कृपादृष्टीचा

संत निरंकारी मंडळाचे उप–प्रधान पदमश्री डी.आर. शाहजींच्या श्रध्दांजली समारोह प्रसंगी (दिल्ली) दर्शन देताना सद्गुरु बाबाजी व मातृशक्ति

महात्मा केशोरामजी यांच्या श्रध्दांजलि समारोह प्रसंगी (चंदिगड) संबोधित करताना सद्गुरु बाबाजी

संत निरंकारी मंडळाच्या वतीने तिहार तुरुंगात आयोजित वैद्यकीय शिबिरात पूज्य माताजी व भगिनी सुदीक्षाजींच्या सान्निध्यात मातृत्त्वाचा आनंद प्राप्त करत असलेली मुलं

संत निरंकारी

(संत निरंकारी मंडळाचे ध्येय व कार्य आणि संत महापुरुषांची शिकवण
देणारे भक्तिमार्गदर्शनपर मराठी त्रिमासिक)

वर्ष १५ वे | अंक ६वा | जून २००९

* संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव * सहसंपादक - श्री. जगन्नाथ चैतन्य मडकर

अनुक्रमणिका

संपादकीय	संपादक	२
श्रीगुरुवचनामृत	श्रीसद्गुरुदेव	१७
अनीतिचा डाव हा मांडू नको	श्री. अक्षर तपस्वी	३
पारियाचा रवा	श्री. स. वि. लव्हटे	५
एक श्वास	रुपाली ब. पवार	७
संसार-तारक नाम	श्री. सुरेश तिर्लोटकर	९
मन... एक विविधतेचा आविष्कार	कु. भारती ना. आंबेरकर	११
युगप्रवर्तकाची दिव्य वाणी		१३
मनाची दिशा	श्री. नितीन ल. घुरुप	१४
विशेष जनरल बॉडी मिटींग		२५
सद्गुरु बाबाजींचे आवाहन		२८
सद्गुरु बाबाजींद्वारा घेतलेले निर्णय.		३०
भक्तीमध्ये केवळ भोळया भावनेला श्रेष्ठत्व		३२
प्रेमानेच भक्ताची ओळख	श्री. कोंडाजी दे. भागवत	३६
मानवरुपी ज्ञानदीप हीच काळाची गरज	कु. काशिनाथ मांडवकर	३८

गीत / कविता

ज्ञानदृष्टी	श्री. प्रविण रा. बच्छाव	३७
तू सत्य ईश्वरा	श्री. नामदेव बा. खरात	३७
चरणी येऊनी पाहावं	श्रीमती हिराबाई पवार	३७

स्तंभ लेखन

आत्मज्ञान मंथन	१६
वाचकांचे मनोगत	३१

लेखकाच्या विचारांशी संपादक सहमत असणे अनिवार्य नाही.

वर्गणी	वार्षिक	आजीवन
भारत	रु.६०/-	रु.६००/-
इंग्लंड	£10	£125
अमेरिका	$20	$225
युरोप	€20	€225
कॅनडा	$25	$300

प्रति अंक रु. ७/-

कार्यालय/पत्रव्यवहार पत्ता

पत्रिका विभाग,
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, मुं - १४.
फोन/फॅक्स: २४१० २०४७
इंटरनेट: http://www.nirankari.org
ई-मेल: marathi@nirankari.org

मालक

संत निरंकारी मंडळ
संत निरंकारी सत्संग भवन,
माहूल रोड, चेंबूर,
मुंबई - ४०० ०७४.
दूरध्वनी : २५५३ १४ ६८

Member of All India Small and Medium Newspapers Association and Indian Languages Newspapers Association

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक आणि प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी हे मासिक ब्रॉयेक्ट प्रिंटींग प्रेस, कुलकर्णी कॉटेज, गोखले ब्रीज रोड, दादर, मुंबई - ४०० ०२८, येथे छापून संत निरंकारी सत्संग भवन, ५०, मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४ येथे प्रकाशित केले.

संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव

संपादकीय

संत निरंकारी मिशन आध्यात्मिक जागृती निर्माण करण्याचं ध्येय घेऊन प्रगट झालेलं एक मानवतावादी मिशन आहे. मिशनची स्थापना होण्यापूर्वी याच आध्यात्मिक जागृतीच्या प्रेरणेने प्रेरित होऊन तत्कालीन सद्गुरु बाबा बूटासिंहजी महाराजांनाही सत्याची ही ज्ञानज्योत प्रज्वलित ठेवण्यासाठी अनेक कठीण परिस्थितीतून जावं लागलं. आपल्या पश्चात या सत्याला स्वीकारून त्याची जोपासना करणारं कोणीतरी मिळेल या शोधात असतानाच त्यांना या सत्याच्या मार्गावरून चालणारा सहकारी आणि निष्ठावंत भक्ताच्या रुपात बाबा अवतारसिंहजी मिळाले.

बाबा अवतारसिंहजींनी आपल्या सद्गुरुचा सेवा-सत्कार आणि गुरुवचनाचं पालन हे इतक्या अवर्णनीय पध्दतीने केले की, बाबा बूटासिंहजींनी शरीर सोडण्यापूर्वी या सत्याचा वारसदार अर्थात सद्गुरुपदाची जबाबदारी बाबा अवतारसिंहजींना प्रदान केली. सद्गुरुच्या या आध्यात्मिक विचारधारेला जन मानसांपर्यंत पोचविण्यासाठी बाबा अवतारसिंहजींनी त्याला 'संत निरंकारी मिशन' चं स्वरुप प्रदान केलं. त्यानंतर मिशनच्या ध्येय-धोरणांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांसोबत रात्रंदिवस एक करून हजारो जिज्ञासू भाविकांना या अभियानात सामिल करून त्यांना लौकिक आणि पारलौकिक जीवनाचा आनंद प्राप्त करून दिला. सन १९४८ ते १९६२ पर्यंत या सेवेअंतर्गत त्यांनी आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षणाचं योगदान दिलं.

सप्टेंबर १९६२ ला सद्गुरुपदाचा मुकूट त्यांनी बाबा गुरबचनसिंहजींच्या मस्तकावर चढविला आणि पुन्हा एखाद्या सामान्य गुरसिखाप्रमाणे जीवन जगून एक नवा आदर्श प्रस्थापित केला. आपल्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत बाबा गुरबचनसिंहजींनी तर आध्यात्मिक क्षेत्रात नव्या क्रांतीचा इतिहासच घडविला. बाबा अवतारसिंहजींनी देशाच्या सीमेपर्यंत आणून ठेवलेला हा मिशनचा सत्य संदेश देश-प्रांताच्या सीमा ओलांडून परदेशात नेऊन ठेवला. देशोदेशी हे सत्य पोहचावं ही तळमळ घेऊन बाबा गुरबचनसिंहजींनी प्रत्येक मानवमात्राला मिशनच्या ध्येय-उद्दिष्टांबाबत जागृत केलं. परिणामी विश्वातील बऱ्याचशा देशात संत निरंकारी मिशनचा नावलौकिक झाला. आध्यात्मिक प्रगतीच्या दृष्टीने भवन निर्माण करण्यासोबतच त्यांनी सामाजिक कार्याच्या दृष्टीनेही मिशनला जगासमोर आणलं. शाळा, महाविद्यालयं आणि धर्मदाय दवाखाने उघडून समाजाशी मिशनचा संबंध प्रस्थापित केला. प्रचार-प्रसारात त्यांचं इतकं योगदान लाभलं की, प्रत्यक्ष रुपात मिशनच्या 'मानवतेच्या' सिध्दांताची जोपासना करताना त्यांना या सत्याच्या बलिवेदीवर आपलं बलिदानही करावं लागलं.

बाबा गुरबचनसिंहजींच्या बलिदानानंतर सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी तर ज्या पद्धतीने मानवतेची सेवा केली आणि मिशनला एका सर्वोच्च पातळीवर आणून ठेवलं, त्याची तर इतिहासात तोड नाही! आध्यात्मिकतेच्या या चळवळीचं नेतृत्व करत आजतागायत सद्गुरु बाबाजी मानवतेची सेवा करुन ब्रह्मज्ञानाच्या प्रकाशापासून दूर असणाऱ्या प्रत्येक दिव्याला प्रकाशित करण्याचं कार्य करत आहेत. आज मिशनची जी लोकप्रियता पहायला मिळत आहे त्यासाठी मिशनच्या तिन्ही पातशाहींनी (सद्गुरुंनी) आपल्या जीवनाचा क्षणन्क्षण खर्ची घातला आणि या मानवतावादी मिशनचा प्रचार - प्रसार केला.

कोणतंही अभियान अथवा चळवळ हे कोण्या एकट्या व्यक्तीचं काम नव्हे. अर्थात् सद्गुरु जरी समर्थ असले तरी त्याचं श्रेय स्वत: न घेता आपल्या भक्तांना देण्यासाठी त्यांच्याकडून हे कार्य करुन घेतो, म्हणूनच समर्थ सद्गुरु बाबाजींनीही आपल्याला या अभियानात सहभागी करुन घेतले आहे, काही जबाबदाऱ्या दिलेल्या आहेत.आता प्रश्न हा उपस्थित होतो की, काय आपणही तितक्याच निष्ठेने आणि विश्वासाने त्या जबाबदाऱ्यांचं पालन करतो का? व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून मिशनच्या सेवेची संधी सद्गुरुने आपल्याला उपलब्ध करुन दिलेली आहे. थोडंसं अंतर्मुख होण्याची गरज आहे की, प्रत्यक्षात प्रचार-प्रसारासाठी माझं स्वत:चं योगदान किती आहे? इतरांना एकतेचा संदेश देण्याआधी आम्हा सर्व गुरसिख महापुरुषांमध्ये ताळमेळ आहे का? नाहीतर आताच १७,१८ एप्रिल रोजी दिल्लीत पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत सद्गुरु बाबाजींना असं आवाहन करण्याची गरज भासली नसती की,**'परस्पर सद्भावनेचे वातावरण निर्माण करुन मिशनप्रति उत्साहाने कार्य करा'**. सद्गुरु तर दयेचा सागर आहे. त्याने जरी आपण आजपर्यंत केलेल्या सेवा परवान केल्या असल्या तरी त्यात आणखी सुदृढता आणू या आणि आमच्यासाठी आलेल्या सद्गुरुच्या संकेतानुसार कार्य करत मिशनच्या प्रचार - प्रसारात नव्या उत्साहाने सामिल होऊन सद्गुरुच्या आशीर्वादाला प्राप्त होऊ या!

अनीतिचा हा डाव मांडू नको

सर्व पशू प्राण्यांमध्ये हत्ती हा प्राणी इतका बलवान आणि अवाढव्य शरीराचा असतो, की त्याच्या शारीरिक सामर्थ्याचा स्पर्श देखील एखाद्याला प्राणहीन करण्यास पुरेसा असतो. अत्यंत विषारी सर्पाचा एक श्वास देखील इतका विषयुक्त असतो, की तो एक विषयुक्त श्वास एखाद्याचा जीव घेण्यास पुरेसा ठरतो. एखाद्या राजा-महाराजाचं हसणं देखील धोकेबाज असतं. त्याच्या मनात उत्पन्न होणारे भाव आणि मनाचा खोलवरपणा समजणे अगदी कठीण असते. तो कधी खूश होईल आणि कधी नाराज होऊन एखाद्याच्या मानेवर तलवार फिरवील हे सांगू शकत नाही. परंतु या सर्वांहून विलक्षण एक जीव आहे... तो दुर्जन. अशी दुर्जन व्यक्ती जरी कितीही आदरभाव दाखवत असली तरीही त्याच्यापासून सावध राहिले पाहिजे. तो दुर्जन अगदी शेवटपर्यंत आदरभाव दाखवत राहील, परंतु न जाणो कधी दंश करील याचा थांगपत्ता लागणारही नाही. हत्ती, सर्प, राजा किंवा इतरांमध्ये जी मारकशक्ती असते; त्याच्या दुप्पटीनं ती दुर्जनाच्या अंगी असते. त्याच्याजवळ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असे अनेक उपाय तर असतातच आणि गरज भासल्यास आपले गुण प्रगट करण्यासाठी तो अशा काही अनेक घडामोडी घडवून आणतो की, असं काही घडू शकतं असा विचार इतर कोणीही करणार नाहीत. असे दुर्जन आपल्या कलेतच इतके तरबेज असतात की, कित्येकदा डोळ्यानं पाहिलेलं आणि कानानं ऐकलेलं देखील चुकीचं होऊ शकतं. हाच भावार्थ पंचतंत्र ग्रंथातील

स्पृशन्नपि गजो हन्ति जिघ्रन्नपि भुजंगम:।
हसन्नपि नृपो हन्ति मानयन्नपि दुर्जन:।।

या श्लोकात कथन केला आहे.

एखाद्या व्यक्तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणं म्हणजे त्या व्यक्तीची हत्या करण्यासारखं असतं. राजकारणात वावरणारे लोक तर असेच कृत्य करतात. काही वेळा असे काही किळसवाणे प्रसंग निर्माण करतात, की अंगावर काटे उभे राहावेत. एकदा फ्रान्समध्ये परतंत्र्याचे साम्राज्य असताना स्वातंत्र्याचा उदयकाळ जवळ आला होता. तेथे वास्तव्य करणाऱ्या परकीय लोकांनी तेथील एका लोकमान्य नेत्याच्या व्यक्तिमत्त्वाबाबत उलट-सुलट विधानं करायला सुरुवात केली. तेथील एका मूळ नागरिकाला विरोधक बनवून त्या लोकमान्य नेत्याविरुद्ध चुकीचा खटला दाखल केला. त्याच्या चारित्र्याला असं काही हीन दर्जाचं लेखण्यात आलं की, त्याच्या सोबत सदैव जे लोक होते, तेही त्याची साथ सोडून दूर गेले. परिणाम असा झाला की, त्या लोकमान्य नेत्याला तुरुंगात डांबण्यात येऊन त्याचा छळ करण्यात आला आणि त्यामुळे देशाला जे स्वातंत्र्य बीस दिवसात मिळणार होते; ते बीस महिन्यानंतर मिळाले. अशातऱ्हेने निंदक आणि क्रूरकर्म्यांची नीती कामास आली.

याबाबत तत्त्वज्ञानी अरस्तू यांनी म्हटले आहे की, लोकांजवळ निरनिराळ्या प्रकारची हत्यारे असतात. जेव्हा सर्व तऱ्हेची हत्यारे वापरूनही लोक काहीही करू शकत नाहीत तेव्हा ते अफरातफर, चारित्रिक दोष किंवा एखाद्या प्रकारचा खोटा आरोप लावण्याची चाल खेळतात. स्वत: पडद्याआड राहून दुसऱ्यांच्या खांद्यावरून आरोपांचे बाण मारतात. अशा पूर्ण गुप्तकटाचे स्वत: सूत्रधार असूनही शेवटपर्यंत त्याचं नाव मात्र कधीही पुढे येत नाही. हजारो वर्षांपासून एक गोष्ट पाहायला मिळते की, जेव्हा सर्व प्रकारची हत्यारं नेस्तनाबूद होतात तेव्हा चारित्र्य-हननाचं हत्यार उपसलं जातं आणि ते आपलं काम करून जातं. जितक्या वेगाने अफवा पसरवल्या जातात, तितक्याच वेगाने लोक अफवांच्या प्रवाहात वाहू लागतात. लोकांना खरं काय आणि खोटं काय याच्याशी काहीही देणं-घेणं नसतं, त्यांना फक्त काही तरी मिळवायचं असतं. चारित्र्य-हनन करणे हे घोर पाप तर आहेच, शिवाय ते हत्येसारख्या पापाहूनही अधम पाप आहे. त्याचा परिणाम सर्व समाजाला भोगावा लागतो. कारस्थानी व्यक्ती ही आपल्या पद्धतीने चालतच राहणार. त्याची शांती किंवा त्याच्या आनंदात कोणताही फरक पडत नाही. परंतु सत्याच्या मार्गावर चालणारा मात्र नाहक त्रस्त होतो. अशा कारस्थानी माणसांच्या डोक्यात कट-कारस्थानाचे किडे सारखे वळवळत असतात. ज्याप्रमाणे शेणात वळवळणारा शेणकिडा शेणातून बाहेर काढताच मरून जातो, त्याप्रमाणे चलाख आणि कावेबाज जर छळ-कपट करत नसेल तर तो निष्प्राण

होईल. समाजाला भ्रमिष्ट करण्याच्या दोषाचा टिळा त्याने आपल्या कपाळी लावलेला असतो आणि त्याला त्याची कदापिही चिंता नसते. तो हाच विचार करतो की, आता तर आपण फायद्यात आहोत; पुढे काय होईल हे नंतर पाहू. अर्थात् त्याला फक्त आपल्या स्वार्थाशीच देणं घेणं असतं. तसे पाहिल्यास हा किती मोठा अन्याय आहे? समाज चांगल्या लोकांपासून जो लाभ उठवू शकत होता, तो अशा कारस्थानी लोकांमुळे उठवू शकला नाही हे घोर पाप नाही तर काय? युगानुयुगे कपटी शकुनी आणि पाताळयंत्री मंथरा निर्माणच होत राहिल्या. आपल्या कपटनीतिच्या बळावर समाजाला आपल्या मुठीत ठेवण्याचा प्रयत्न केला. अशा व्यक्ती जोपर्यंत जिंकत राहिल्या तोपर्यंत त्या जगाला तापदायक ठरल्या. परंतु एके दिवशी जेव्हा या जगातून त्या निघून गेल्या, तेव्हा त्यांची उघडी मूठ रिक्तीच राहिली... सर्व काही जागच्या जागीच राहिलं, आयुष्यभर जमा केलेली साधन-संपत्ती सोबत गेली नाही आणि ज्या शरीराच्या माध्यमातून कपट-कारस्थानं केली ते शरीरही मातीतच मिसळले तसेच ज्यांच्यासाठी गैरकृत्ये केली, त्यांनीही पाठ फिरविली... मग जाताना सोबत काय गेलं? गेलं ते त्यांनी केलेले कुकर्म. या सर्व गोष्टींची त्यांना जाणीव नसते का? जाणीव असते, परंतु त्यांच्या मन, बुद्धी व विवेकावर विषयवृत्ती, तृष्णा व वासनेचा पडदा पडलेला असतो, जो जीवनभर नीच कर्म करण्यास त्यांना प्रेरित करत असतो.

संसारात जेव्हा अधर्म प्रबळ होतो, तेव्हा त्याच्या मुळात कुठे-न-कुठे धर्म असतोच, ज्याच्या बळावर अधर्म डोके वर काढतो. धर्माच्या बळावर त्याची शक्ती सामर्थ्यशाली बनते. दानवांनी तपश्चर्या केली ती धर्माच्या बळावर आणि तपाच्या शक्तीने सामर्थ्यवान बनले. सामर्थ्य प्राप्त होताच धर्माचा मार्ग सोडून दानव अधर्मी बनले. जेव्हा समाजाला त्रास देण्यासाठी मिळालेल्या सामर्थ्य-शक्तीचा त्यांनी दुरूपयोग केला, तेव्हा त्यांच्या दानवी हैदोसामुळे देवी-देवतांनाही काही काळ विवश व्हावे लागले. असे असले तरी असे दुराचारी दुसऱ्यांची सात्विक शक्ती पूर्णतया नष्ट करण्यास असमर्थ ठरतात. अधिकार शक्ती मिळवूनही आपल्या शक्तीचा जनहितासाठी सदुपयोग न करता दुरूपयोग करणारे आपल्याच विनाशाची खाण खोदून ठेवतात. दुसऱ्यांसाठी खोदलेले लहान-सहान खड्डेही त्यांच्या स्वत:साठी खोल दरी बनते. जेव्हा अशा व्यक्ती स्वत:स नियंत्रित करण्यास असमर्थ ठरतात, तेव्हा मग जगन्नियंत्या प्रभूला आपलं कार्य करावं लागतं... प्रकृतिच्या माध्यमातून का असेना! दुराचाऱ्यांचं षड्यंत्र आणि उत्पात जेव्हा आपली सीमा ओलांडतात, तेव्हा प्रकृतीच स्वत: त्यांना उद्ध्वस्त करते. दुराचाऱ्यास शेवटपर्यंत कळत नाही की, विनाश आपला जबडा उघडून त्याच्यामागे उभा आहे. असुरी शक्तिच्या स्वैराचाराने जेव्हा जगताचा आर्त स्वर उमटतो तेव्हा असं काही घडतं की, सर्व काही नियंत्रित होतं. प्रकृतिचं हे संतुलन कार्य सदैव चालत आलेलं आहे, नाहीतर ही पृथ्वी मगर, सर्प, किडा-मुंगी, विंचू आणि दुष्ट मारेकऱ्यांनीच भरली असती.

असा हा छळ-कपट, अनीतिचा डाव युगानुयुगे मांडतच आला आहे आणि सत्याच्या मार्गावर चालणाऱ्या संत-महापुरुषांना छळ-कपट आणि अनीतिरूपी विंचवाचे दंश सहन करावे लागले, अग्निपरीक्षेत होरपळून निघावे लागले. असे असूनही संत-महापुरुषांनी आपला धर्म न सोडता परमपिता परमात्म्याशीच आपलं नातं जोडलं, सदैव परमात्म्याचंच स्तवन केलं. स्वत: प्रभू परमात्म्याची दैवी शक्ती त्यांच्यापैकी कोणातरी एकात अवतीर्ण झाली आणि परमात्मतत्वाचा महिमा व्याप्त झाला. **'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती'** ही उक्ती सार्थ करताना वेळप्रसंगी अनीतिच्या डावाला सामोरे जाऊन अशा संत-विभूतींनी आपल्या प्राणांचीही आहुती दिली. येशू ख्रिस्ताला सुळावर लटकावं लागलं... अनीतिच्या डावानं संत मीराबाईला विषाचा प्याला प्राशन करण्यास भाग पाडलं... आणि याच अनितीच्या डावानं मानवतेचे मार्गदर्शक युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजींना रक्ताच्या थारोळ्यात प्राणाची आहुती द्यायला लावली.

काळ बदलला, युगामागून युगं निघून गेली... जातही आहेत, परंतु अनीतिचा डाव मांडला जातोय, तरीही अधर्म-अनीतिचा डाव मोडण्यासाठी जगदोद्धारक परमात्मतत्व साकार (सद्गुरू) रूपात प्रगट होऊन आत्मोद्धारासाठी इशारा देतोय... अरे, भल्या माणसा! सद्कर्माचा सारीपाट मांड...मानवी जीवनाचे सार्थक कर... परंतु अनीतिचा डाव मात्र मांडू नकोस, नाहीतर शेवटी लाखाची खाकच होईल.

श्री. अक्षर तपस्वी (मुंबई)

पारियाचा रवा

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या एका सर्वांगसुंदर अभंगातील ही उपमा आहे. सद्गुरूकृपा सोडून अन्य साधनांद्वारे ईश्वर प्राप्ती करण्याचा प्रयत्न करणे कसे अशक्य आहे हे त्यातून दर्शविलेले आहे. पारा हा पदार्थ सर्वांना परिचित आहे. पारा जर जमिनीवर सांडला तर तो पुन्हा एकत्र करणे फारच अवघड असते. जसजसे आपण तो पदार्थ हातात घेण्याचा प्रयत्न करू तसतसा तो घरंगळून दूर दूर जात राहतो. परमार्थामध्ये देखील तीर्थ, व्रत, नेम किंवा पूजा-पाठ करून ईश्वर गवसणे अशक्य असते. वास्तविक या कर्मकांडांचे प्रयोजन म्हणजे ईश्वर प्राप्ती नाही. तीर्थाला जाण्याने आपल्याला वेगवेगळ्या प्रदेशाची माहिती मिळते, व्रत किंवा उपवासाने आपल्या शरीराला लाभ होतो. शास्त्र पठन केल्याने आपल्या ज्ञानात भर पडते. परंतु ही कर्मकांडे भक्ती समजून करणे किंवा ईश्वर प्राप्तीचे साधन म्हणून आचरणे हा आपला भ्रम आहे. शिवाय आपण मोठी भक्ती करीत आहोत असा वृथा अभिमान मात्र येऊन चिकटतो. म्हणूनच साधु-संतांनी मानवाला ईश्वरप्राप्तीचे एकमेव साधन म्हणजे सद्गुरूकृपा असल्याचे समजावले आहे. ज्ञानेश्वर माऊलींनी त्या अभंगामध्ये म्हटले आहे की,

तीर्थ व्रत नेम भावेबीण सिद्धी।
वायाचि उपाधी करिसी जना।
भावबळे आकळे येरहवी नाकळे।
करतळी आवळे तैसा हरि।
पारियाचा रवा घेता भूमीवरी।
यत्न परोपरी साधन तैसे।
ज्ञानदेव म्हणे निवृत्ती निर्गुण।
दिधले संपूर्ण माझे हाती।।

(ज्ञानदेव गाथा - ६९)

एक वेळ गुरूदेव हरदेवांनी एका सज्जनाने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना मनुष्य करीत असलेल्या विविध कर्मकांडांचे रहस्य समजावून सांगताना स्पष्ट केले की, ''मुख्यत्वेकरून या कर्मांचा संबंध आपल्या सामाजिक जीवनाशी किंवा शरीराशी निगडित आहे. काही कर्मे धार्मिक स्वरूपाची आहेत; परंतु आपल्या आध्यात्मिक जीवनाशी यांचा फारच कमी संबंध आहे. ज्याचा संबंध आहे ती सुद्धा ज्ञानोत्तर करण्यायोग्य आहेत.''

स्नान, योगासन, व्रत इत्यादी आपले शरीर स्वस्थ ठेवतात. दान-पुण्यादी कर्मांद्वारे शाळा, महाविद्यालये, दवाखाने यांसारखी समाज कल्याणात्मक कामे होतात, ज्याचा लाभ जनसामान्य घेऊ शकतात. हवन-यज्ञ इत्यादी वातावरण शुद्ध करण्यास मदत करतात, त्याद्वारे प्रदूषणातून सुटका मिळते. जप-ध्यान-संध्या इत्यादींना धार्मिक कर्म म्हणता येईल; परंतु परमात्म्याच्या जाणकारीशिवाय ती करताच येत नाहीत. कारण जोपर्यंत आपण परमात्म्याला जाणत नाही तोपर्यंत त्याचे ध्यान कसे करणार? आज सर्वसाधारण लोक लकीरचे फकीर बनून जी कर्मे आचरत आहेत त्या धार्मिक क्रिया नसून केवळ देखावा आहे. अंधश्रद्धेमुळे त्यांचा मूळ भावार्थ न समजताच केवळ यंत्रवत ती करीत चालले आहेत. आता आपणच सांगा की, ही कर्मे मोक्ष कशी काय देऊ शकतील? दास तर असेच समजतो की, मोक्षाचा थेट संबंध आत्मा-परमात्म्याशी आहे. आत्मा जेव्हा परमात्म्याला जाणून त्याच्याशी तादात्म्य पावतो तेव्हा भवचक्रातून सुटतो. यालाच मुक्ती किंवा मोक्ष म्हणतात.''

वर्तमान सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी किती सुंदर रीतीने अगदी साध्या-सोप्या पद्धतीने एका गहन विषयाचे विश्लेषण केले आहे. मानवाने आज अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. भौतिक जीवनात मनुष्य अगदी सावध वागतो, कोणते कर्म का करावे आणि त्याचा लाभ काय व हानी काय हे सर्व तो

लक्षात घेतो. परंतु भक्तिच्या बाबतीत, ईश्वराच्या बाबतीत मात्र तो आंधळ्याची भूमिका घेतो. भक्तिच्या नावाखाली करीत असलेल्या कर्माकडे तो डोळसपणे पाहत नाही. वास्तविक तो त्याचा दोष नाही तर त्याच्या भोवतालच्या परिस्थितीचा दोष आहे असे म्हणावे लागेल. कारण या बाबतीत त्याला जागृती मिळेल, योग्य मार्गदर्शन मिळेल असे वातावरणच त्याला मिळत नाही. हे वातावरण मिळण्यासाठी संतांच्या संगतीची नितांत गरज आहे. आज निरंकारी मिशन संपूर्ण विश्वामध्ये जागोजागी सत्संग कार्यक्रमांचे नियमितपणे आयोजन करून मानव समाजाला हे जागृतीचे वातावरण प्रदान करण्याचे कार्य करीत आहे. संतांच्या सान्निध्यात गेल्यानंतरच मानवाला ईश्वराच्या खऱ्या स्वरूपाची जाणकारी प्राप्त होते आणि ती प्राप्त करण्यासाठी सद्गुरूची अनिवार्यता लक्षात येते. याबाबतीत समस्त साधु-संतांचे व अवतारी महापुरुषांचे एकमत असल्याचे आढळून येते. वेदग्रंथशास्त्रेही त्याचीच ग्वाही देतात.कठोपनिषदा मध्ये म्हटले आहे -

नायमात्मा प्रवचनेन लभ्या न मधया
न बहुना श्रुतेन।
यमवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा
विवृणुते तनु स्वाम्।।

(कठो. १.२.२३)

(अर्थात् केवळ धर्मोपदेश श्रवण करून, स्तुतीगायनाद्वारे ईशचर्चा करून अथवा शास्त्रांचे अध्ययन करून परमात्म तत्व जाणले जाऊ शकत नाही. ज्यावर त्याची कृपा होते तोच त्याला जाणू शकतो. यथार्थ शिष्याच्या समक्ष परमात्मा (सद्गुरूरूपात येऊन) स्वत:च आपले वास्तविक स्वरूप प्रकट करतो.)

वास्तविक ईश्वराची ओळख झाल्यानंतर त्याची भक्ती होऊ शकते. ईश्वराशी नाते जोडल्यानंतरच खरी भक्ती सुरू होते. परंतु मनुष्य अज्ञानामुळे विविध कर्मकांडांनाच भक्ती समजून आपले आयुष्य वृथा दवडीत असतो. शहनशाह बाबा अवतारसिंहजी महाराज संपूर्ण अवतारवाणीमध्ये लिहितात -

कैक समजती श्वास चढवूनी ध्यान लाविणे
ही भक्ती।
कैक समजती घर त्यागूनी बनात जाणे
ही भक्ती।
कैक समजती जाऊन तीर्था करणे स्नान
असे भक्ती।
कैक बोलती ढोल पिटूनी कीर्ती गाणे
ही भक्ती।
कैक बोलती तन्मय होऊन गायन करणे
ही भक्ती।
अवतार संतजन ऐका सारे हरि प्राप्ती
करणे भक्ती।।

(पद क्र. १९३)

जीवन सार्थक व्हायचे असेल तर परमार्थ केला पाहिजे आणि परमार्थ साधायचा असेल तर सद्गुरू पाहिजे. असे हे भक्तीचे सूत्र आहे. कारण सद्गुरूशिवाय परमार्थाच्या क्षेत्रात आपल्याला कोणीही मार्गदर्शन करू शकत नाही. वास्तविक पाहता सद्गुरू ही निराकार ब्रह्माची साकार सत्ता होय आणि क्षणार्धात परमतत्वाचा बोध करून देणे हेच त्याचे सर्वात मोठे लक्षण. समर्थ रामदास स्वामी दासबोधामध्ये लिहितात -

सद्वस्तु दाखवी सद्गुरु।
सकळ सारासार विचारु।
परब्रह्माचा निर्धारु। अंतरी बाणे।।
जे अभ्यासे अभ्यासिता नये।
जे साधने असाध्य होये।
ते हे सद्गुरुविण काये। उमजो जाणे।।

तात्पर्य अन्य कोणतेही साधन-भजन करीत न बसता मानवाने समर्थ सद्गुरूचा शोध घेतला पाहिजे, जेणेकरून त्याला परब्रह्माची प्राप्ती होईल आणि जीवन सार्थकी लागू शकेल.

स. वि. लव्हटे (जुईनगर-नवी मुंबई)

एक श्वास

आपण साधारणतः दिवसाच्या २४ तासांमध्ये पंचवीस हजार नऊशे वीस वेळा श्वास घेतो. परंतु त्यापैकी किती श्वासामध्ये जो कर्ता करविता ईश्वर आहे त्याचे नाव घेतो? विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, ज्या परमेश्वराने आपल्याला निर्माण केलं त्या परमेश्वराची आपल्याला किती आठवण होते?

जीवन हे क्षणभंगूर आहे
एका क्षणी आहे तर दुसऱ्या क्षणी नाही.

आज आपण पुढचा श्वास घेऊ की नाही हेही आपल्याला माहीत नाही. प्रत्येक श्वास त्या कर्त्या करवित्याच्या हाती आहे, तरीही आपण त्याला विसरतो. जो देणारा आहे त्याला विसरलो तर श्वास मागायचा कोणाकडे?

एक-एक श्वास हवा आहे म्हणून शेवटची घटका मोजताना तडफडत असतात, हे आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहतो खरे! फक्त बघ्याचीच भूमिका बजावित असतो. कितीतरी जीव मरणयातना सोसताना एक-एक श्वास मोजतात आणि देवाकडे प्रार्थना करतात, 'आता पुढचा श्वास नको, मरण दे', अगदी शेवटी श्वास घेताना आम्हाला देव आठवतो, परंतु त्याच देवाची दिवसातून एकदा तरी आठवण होते का?

नाळ तोडल्यावर मूल जेव्हा प्रथम श्वास घेते तेव्हा ते समाजाचा घटक बनते, मान्य आहे. पण श्वास घ्यायचं स्पेशल ट्रेनिंग त्याला द्यावं लागत नाही. ते आपोआपचं घडतं. याचा निर्माता कोण? याचा कधी विचार केला का?

जसे रानोमाळ भटकणाऱ्या हरिणीला 'कस्तुरी' तिच्या नाभीत आहे असे सांगणारा भेटत नाही तोपर्यंत ती भटकते. अगदी तसेच आपल्या जीवनात श्वासाचे मोल सांगणारा सद्गुरू भेटत नाही तोपर्यंत आपणही असेच भरकटत होतो.

आज आपण भाग्यवान आहोत म्हणून आपल्या जीवनात तिन्ही लोकांचे मालक युगद्रष्टा सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज आले आणि अनमोल ज्ञान प्राप्त होऊन प्रत्येक श्वासाची किंमत कळली नरदेहाचे सार्थक करण्याची संधी प्राप्त झाली. संतांची संगत लाभली.

संत तोच प्रति श्वासामाजी हरिनामाचे स्मरण करी। संत खरा तोची परपीडा क्षणात एका दूर करी। (अवतारवाणी २५८)

तोच संत संबोधला जातो, ज्याच्या प्रत्येक श्वासामध्ये हरिचे स्मरण असते. विचार करा, दातारने आपल्याला संतांच्या संगतीला बसवले आहे आणि आम्ही काय करत आहोत?

संथ जलाशयात दगड टाकला म्हणजे ते गोल तरंग किनाऱ्यापर्यंत जातात. ते बघताना अंगावर तशीच वलयं निर्माण होतात. पण असा अकारण आणि अचानक दगडांचा आघात होताक्षणी जलाशयाला काय वाटत असेल याचा कुणी विचार करतं का? जलाशय काहीही बोलत नाही. अगदी असंच एखाद्याने शिवीगाळ दिली तरी संत हसून पाहतात. विचार करण्याची वेळ आली आहे. आज आपल्याला समोरच्याने शिवी दिली तर त्याचा सूड उगवून नंतरच आपण निःश्वास टाकतो; होय ना? याला जबाबदार कोण? आपणच ना?

आपण दातारकडे अरदास करतो की 'हर साँस में हो सिमरन तेरा' अखेरच्या श्वासापर्यंत नामस्मरण, सत्संग, सेवा घडो. पण आपण किती श्वासात नामस्मरण करतो? एकदा मनाला विचारू तरी.

एका विचारवंताने म्हटलं आहे-

एका वर्षाची किंमत नापास झालेल्या विद्यार्थ्याला विचारा!

एका महिन्याची किंमत अपूर्ण काळात जन्म घेतलेल्या अर्भकाच्या आईला विचारा.

एका आठवड्याची किंमत साप्ताहिक संपादकाला विचारा.

एका दिवसाची किंमत शेतीत राबणाऱ्या

शेतकऱ्याला विचारा.

एका रात्रीची किंमत फुटपाथवर झोपणाऱ्या निराधाराला विचारा.

एका तासाची किंमत प्रेमिकांना विचारा.

एका मिनिटाची किंमत ट्रेन चुकलेल्या प्रवाशाला विचारा.

एका सेकंदाची किंमत अपघातात जखमी झालेल्याला विचारा.

एका क्षणाची किंमत शर्यतीत हरणाऱ्या खेळाडूला विचारा.

एका श्वासाची किंमत जन्म-मृत्यूशी झुंज देत मरणाच्या दारात असलेल्या माणसाला विचारा.

म्हणूनच आज सद्गुरूच्या छायेखाली आपल्या प्रत्येक श्वासाला सांगावेसे वाटते की,

श्वासांनो जा वायुसंगे ओलांडूनी भिंत
अन् सद्गुरूला कळवा आमुच्या हृदयातील खंत
सांगा! वेडी तुझी मुले ही या अंधारात
बद्ध करांनी तुज करीती अखेरचा प्रणिपात
जन्म-मुक्तीचे एकच वेड परि अनिवार
परि अनिवार
देशील ना! पण तुझ्या कुशीचा या वेड्यांना
आधार या वेड्यांना आधार!!

अशाप्रकारे आपण प्रत्येक श्वासाला जागवूया आणि सद्गुरूच्या नामस्मरणात तल्लीन करूया. सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज हेही आपल्याला आवाज देत आहेत -

लो मैं रखता हूँ आपके भीतर
एक ज्ञान की, विचार की चिंगारी
जिसको आग बनाना है तुम्हारी जिम्मेदारी

आपल्या प्रत्येक श्वासात नामस्मरण आणि प्रत्येक विचारात ज्ञानाची ठिणगी यांचे आचरण करू या

समेटलो इन नाजूक पलों को
न जाने ये लम्हे कल हो ना हो
हो भी ये लम्हे कल, क्या मालूम
इन पलों में शामील हम हो ना हो!

म्हणूनच प्रत्येक श्वास सत्कर्मी लागावा असे आचरण ठेवू या, प्रत्येक श्वास नामस्मरणात तल्लीन करू या! म्हणून अनमोल श्वास देणाऱ्या दातारविषयी लिहावसं वाटतं -

उपकारांचे हेच मोठे ओझे,
का जाण याची मना वाटली ना कधी।
मगरूर मन हे सदा लागू दे तव पदी,
तू दया करावी उणीव भरावी
शुद्ध करी अंत:करण।

खरोखरच प्रत्येक श्वासाची किंमत करण्याची वेळ आली आहे. 'समय का नगारा बज रहा है, अब तो जागो!' नाहीतर अशी वेळ येईल की, जसं एका कवीने म्हटलयं -

''दोन दिवस दु:खात गेले, दोन दिवस वाट पाहण्यात गेले आता मोजतो आहे डोईवरती राहिलेत किती उन्हाळे. शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्री धुंद झाली पण भाकरीचा चंद्र शोधण्यातच सारी जिंदगी बरबाद झाली.

म्हणून सद्गुरूंजवळ प्रार्थना करावीशी वाटते की प्रत्येक श्वास, श्वासातील आस तुमच्यासाठी जावो. शेवटच्या श्वासापर्यंत सत्संग सेवा, नामस्मरण घडो.

मरताना असं वाटलं आयुष्य पूर्ण वाहून गेलं
मला जगायचंय, मला जगायचंय
म्हणता म्हणता जगायचंच राहून गेलं

असे म्हणण्याची वेळ येऊ नये सद्गुरूने दाखविलेल्या मार्गावरून चालण्याची सद्बुद्धी लाभावी हा आशीर्वाद मागू या. सद्गुरू चरणी हीच प्रार्थना,

भक्त म्हणून तुमच्या हृदयी नेहमी मला स्थान पाहिजे, तुम्ही मला आपलंसं केलंत याचे मला भान पाहिजे!

कर्ता करविता ईश्वर त्यावर सोडते भार
हरदेव चरणी करते प्रार्थना
आम्हा सर्वांची नौका लाव पार

रुपाली बळीराम पवार,
मु. पो. खोडद (सातारा), ता. जि. सातारा

संसार- तारक नाम

संसार म्हटला म्हणजे मनात अनेक प्रकारच्या विचारांचं थैमान माजतं. आपण तर सर्व साधारण माणसं आहोत. परंतु महान-महान संतांनासुद्धा या संसाराने सोडले नाही. म्हणून ज्या ज्या महात्म्यांना या संसाराचा अनुभव आला त्या त्या महात्म्यांनी आपापल्या परीने या संसार परिणामाचे निराकरण कशा पद्धतीने करता येईल याबद्दलचे मार्मिक, समर्पक उत्तर शोधून काढले आहे. यावरून असे दिसते की, संसार हा एक उग्ररूपधारक महाकाय राक्षसच आहे. त्याच्या तावडीतून या जगातील एकही प्राणी सुटत नाही. असा हा महाभयंकर संसार आहे. परंतु हा दिसत नाही, मग याला प्रत्यक्षात कसे अनुभवायचे? कोणत्याही गोष्टीला दोन बाजू असतातच. जर हा उग्र असेल तर शांतही असला पाहिजे. मग हा शांत कशापासून होतो?

ज्याप्रमाणे म्हणतं, एखाद्या ठिकाणी भूत आहे आणि त्याच्या तावडीत मिळालेल्या माणसाला ते सोडत नाही, हे ज्याने ऐकले असेल तो माणूस त्या ठिकाणी पोचताच त्याच्या मनात ती दंतकथा आल्याशिवाय राहणार नाही. परंतु ज्याला त्याबद्दल काहीच माहिती नाही असा माणूस तिथून जात असेल तर त्याला त्याची भीतीच वाटणार नाही. कारण त्याच्या मनात त्याचा आभासच नसतो. संसार या शब्दाच्या बाबतीत नेमके तसेच आहे. तसे पहाता संसार सुखदायकसुद्धा आहे. नुसतेच दुःख आहे असे होतच नाही. कारण हाच संसार संपूर्ण जगाचा एक मायिक आधार आहे. या मायिक आधारातून निर्माण होणारे विकार हेच माणसाला साधक बाधक परिणाम स्वरूपाचे असतात. त्यातूनच कधी सुख तर कधी दुःख येत जात राहणार. आपण याच संसारातील प्रत्येक गोष्टींचा उपभोग घेत असताना त्याचे सुपरिणाम तसेच दुष्परिणामही होऊ शकतात. जर याच्यातून आपल्याला सुखच पाहिजे असेल तर आपल्याला संसाराच्या दुसऱ्या बाजूने जावे लागेल. जसे नदीला महापूर आलेला आहे आणि आपल्याला पलीकडे जायचे आहे, तर त्या पुराच्या पाण्यात उतरून पलीकडे जाता येणार नाही. त्यासाठी नदीवर बांधलेल्या एखाद्या पुलाचा आधार घ्यावा लागेल किंवा एखाद्या नावेच्या आधाराने पुराच्या पाण्याचा काहीच त्रास न होता आपल्याला पैलतीरी जाता येईल.

समर्थ रामदास स्वामी म्हणतात **'संसार म्हणीजे महापूर। माजी जळचरे अपार डंखू धावती विखार। काळसर्प!'** या संसाररूपी महापुरात आशा, तृष्णा, माया, ममता, काम, क्रोध, लोभ, मोह अशाप्रकारचे अनेक विषारी काळसर्प आहेत आणि हे प्रत्येकाला विषारी डंख मारतात. अर्थात माणूस स्वतःहून या वासनांच्या आहारी जातो आणि दुःख ओढवून घेतो. अर्थात या क्षणिक, नाशिवंत सुखाच्या आशेनं माणूस महाभयंकर दुःखांचा मालक बनतो आणि याच्यातूनच सुखाची अपेक्षा करतो. या सुखासाठी तो रात्रंदिवस धावत असतो. त्यातून काही प्राप्त झाले नाही म्हणजे हताश होऊन याच संसाराच्या नावावर आपल्या दुःखाचे खापर फोडतो. या संसाराला दोष देतो. म्हणजेच या संसाराचे भूत आपणच आपल्या मागे लावून घेतलेले आहे असे म्हणणे वावगे होणार नाही.

समर्थ पुढे म्हणतात -

माथा प्रपंचाचे ओझे। घेऊन म्हणे माझे माझे
बुडताही न सोडी फुंजे। कुळाभिमाने.

या संसार सागरात बुडाले तरी डोक्यावरचे (नसलेले प्रपंचाचे) ओझे सोडत नाहीत. मान, प्रतिष्ठा, धर्म, जात या अशा अनेक प्रकारचे ओझे डोक्यावर सतत, रात्रंदिवस घेऊन हा माणूस सैरावैरा धावतच आहे. त्यामुळे तो सुख सांडून दु:ख कवटाळत बसला आहे.

अरे माणसा! या तुझ्या सर्व संसारदु:खाचा अभ्यास करून महात्मा महापुरुषांनी अनेक पूल बांधले आहेत, या भवसागरातून तरून जाण्यासाठी अनेक जहाजं सोडली आहेत. म्हणून हा भवसागर, संसार तरून जाण्यासाठी त्या पुलाचा उपयोग कर, त्या जहाजांचा आधार घे. मग हे सर्व काळसर्प तुला सुखरूप जाताना पाहून तेच खजील होतील, तेच तुला सलाम करतील. हेच आहे ते नाम रूपी जहाज, नामरूपी पूल. संत शिरोमणी तुकाराम महाराज म्हणतात -

'नाम घेता उठा उठी होय संसाराची तुटी'

या परमात्म्याच्या नामामध्ये फार मोठी शक्ती आहे. त्या शक्तीपुढे हा संसार पंगू होतो, त्या नामधारकाचा दास होतो. कारण परमात्माच या सर्व संसाराचे उत्पत्ती स्थान आहे. अर्थात या सर्व शक्ती त्याच्या अधीन आहेत. म्हणून जो परमात्म्याचा होऊन जातो, त्याचे अहोरात्र नामस्मरण करतो, त्या महात्म्याचे हा संसार काहीच बिघडवू शकत नाही. उलट त्याला सर्व गोष्टींची पूर्तता करण्यास सहाय्यकच होतो. पुढे संत तुकाराम महाराज म्हणतात, **'नामापरते साधन नाही। जे तू करिशी आणिक काही'** त्यांनी आपला अखेरचा निर्णयच दिला की, हा संसार तरून जाण्यासाठी हेच एकमेव साधन आहे. समर्थ म्हणतात,

देवे आपण घालूनी उडी।
भक्तांसी नेले पैल थडी।
येर ते अभाविक बापुडी। वाहतची गेले।

ज्यांनी ज्यांनी या परमात्म्याचा आधार घेतला ते पार उतरून गेले.

सुख-दु:ख या संसार सागराचे दोन किनारे आहेत. या सुखाच्या किनाऱ्यावर या परमात्म्याच्या भक्तांचा वास आहे, तर दु:खाच्या दुसऱ्या किनाऱ्यावर अभक्तांचा वास आहे. अर्थात या सुखासाठी आम्हाला परमात्म्याच्या भक्तांचा सहवास करणे आवश्यक आहे. आज सद्गुरूच्या कृपेने आम्हाला हा एक भवतारक खरा आधार मिळालेला आहे. सत्संगरूपी मिळालेले तारक जहाज आहे. हा भवसागर आम्ही स्वत:हून पार करूच शकत नाही आणि आम्ही आज त्या सद्गुरूच्या जहाजात बसलो आहोत ते आम्हाला बुडवूच शकत नाही. कारण जहाजात कोणतीही जड वस्तू ठेवली तरी जहाजाच्या आधारामुळे तरून जाते. तद्वत आज आपण वेडे-वाकुडे आहोत पण सद्गुरूचे आहोत.

आज संत निरंकारी मिशन या सत्य नामाच्या आधारे सर्व मानवमात्राला संसार व्यथेपासून विमुक्त करत आहे. या संसाराचे गूढ रहस्य जाणून जीवन जगण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे. साखर खाल्याशिवाय गोडी कळणार नाही. साखर गोड आहे असे म्हणून गोडीचा अनुभव येणार नाही. संत शिरोमणी तुकाराम महाराज म्हणतात,

सुखालागी जरी करिशी तळमळ।
तरी तू पंढरिसी जाय एकवेळ।
मग तू अवघाची सुखरूप होसी।
जन्म मरणाचे दु:ख विसरशी।

नाम हेच सुखाचे आगर आहे, सुखाचा सागर आहे. म्हणून प्रत्येक श्वासाला नामाचे उच्चारण हेच सर्वश्रेष्ठ साधन आहे. त्या नामाच्या उच्चारणासाठी कोणत्याही विधीची गरज नाही. असे हे सहज सोपे भवतारक नाम सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी आम्हाला दिले आहे. या नामाच्या आधारेच आपण आमचे जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न करूया.

- श्री. सुरेश तिलोटकर
(मुंबई)

मन... एक विविधतेचा आविष्कार

मानवी मन एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे धाव घेते आणि कुठल्यातरी एकाच टोकावर थांबणे पसंत करते. एक टोक आहे भोगाचे तर दुसरे टोक आहे त्यागाचे. भोगाच्या टोकावर रमणारे मन वासना, भोजन, सुंदर कपडे, आलिशान वास्तू, मान-प्रतिष्ठा, धन-संपत्ती यावर स्थिर होऊ पाहते; तर त्यागाच्या टोकावर रमणारे मन पर्वत, कपारी, गुहा याकडे धावते. पत्नी, मुलं, घरदार सर्व काही सोडून लपून बसणे पसंत करते. वास्तविक ही दोन्ही टोके परस्पर विरुद्ध आहेत. सध्याच्या काळात माणूस प्रचंड संघर्षातून जात आहे. त्याला केवळ भोग किंवा केवळ त्याग अशी निवड करता येणार नाही. जगापासून दूर पळण्यापेक्षा जगास प्रेमाने जवळ करावे आणि केवळ उपभोग दृष्टीने जगाकडे न पाहता जगासाठी आपणही चांगले तेच करावे. अशी कृती करण्यासाठी मनाची उंची वाढविणे, त्यास उदात्त बनविणे आवश्यक आहे.

मनात सुखाचे भांडार दडलेले आहे, परंतु ते मिळवता येत नाही. कारण मन इतके चंचल आणि चपळ आहे की, ते क्षणभरही स्थिर राहत नाही. म्हणून मनाला स्थिर केल्याशिवाय हे सुखाचे भांडार लुटता येत नाही. मनाला स्थिर करण्याच्या अनेक युक्त्या सांगितलेल्या आहेत, परंतु बऱ्याचदा मन त्यावरसुद्धा मात करून हवे तिकडे पलायन करते. मन इतर इंद्रियाप्रमाणे स्थूल नसल्यामुळे त्याला मर्यादा नसतात. ते हवे तिकडे धाव घेऊ शकते. त्याला आकाश-पाताळही पुरत नाही. तरीही मन हे सुखासाठी आसक्त असते, सतत सुखाच्या शोधातच असते. त्यासाठी तर त्याची एवढी शोधा-शोध आणि पळापळ चालू असते. जर मनाला शाश्वत, कायम टिकणाऱ्या अशा आत्मसुखाचे मार्गदर्शन केले, तर ते सामान्य सुखांच्या मार्गाकडे धावण्याचे सोडून खऱ्या आत्मसुखाच्या मार्गावर निश्चितच धाव घेईल.

मन म्हणजे मानवी जीवनाचा संचालक. एखादी संस्था असेल, तर तिच्या प्रगती किंवा अधोगतीस त्या संस्थेचे संचालक व पदाधिकारी जबाबदार असतात; त्याप्रमाणे मानवी जीवन संस्थेच्या प्रगती किंवा अधोगतीस 'मन' हे संचालक म्हणून जबाबदार असते. मनाच्या ताब्यात कर्मेन्द्रिये आणि ज्ञानेंद्रिये असतात. त्यांनी फक्त मनाचा आदेश पाळायचा असतो. शरीराला चांगल्या स्थितीत ठेवायचे की विपरीत स्थितीत ठेवायचे याचा निर्णयही मनच ठरवते. आपण आपल्या मनावर योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात नियंत्रण ठेवले नाही, तर ते शिरजोर होऊन जसे मदारी माकडाला इशाऱ्यावर नाचावे लागते. अर्थात् मनाचे आपण मालक (स्वामी) आहोत ही आपलीच जाण आपणच नीट करून घेतली, तर मनाला आपण हवे तसे वळवू शकतो. मग मात्र मन पायात शेपटी घालणाऱ्या कुत्र्याप्रमाणे आपले म्हणणे ऐकते.

मनाचे स्वरूप खूपच गुंतागुंतीचे असते. ते नीट समजून घ्यावे लागते. नाहीतर मग मनाबाबत अनेक चुकीच्या कल्पना होऊ शकतात. मागील शतकात मनोविज्ञान विकसित होऊन मनावर खूप संशोधन करून मनाच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यात आला. मन एकच असून विविध रूपात ते आपल्यापुढे उभे राहते. 'माझ्या मनात खाण्याची इच्छा झाली' यात मन शब्दाचा अर्थ इच्छा होतो. 'माझे मन त्याच्यावर जडले' यात मन शब्दाचा अर्थ प्रेम असा होतो. 'माझ्या मनात आले की, मी असे करावे' यात मनाचा अर्थ विचारात्मक बुद्धी असा होईल. 'माझे मन सुखावले' यात मनाचा अर्थ सुखाची स्थिती दाखवतो. अशाप्रकारे मनास ज्या विषयाची इच्छा वाटते त्या विषयाप्रमाणे ते विविध आकार धारण करते. अर्थात मनाच्या इच्छा जाणणारे आपण स्वतः मात्र मनाहून वेगळे असतो. आपण स्वतःच मन असतो तर मनाच्या

इच्छा कशा जाणल्या असत्या? तात्पर्य मन एक विविधतेचा आविष्कार आहे.

✸ देव सूर्याच्या किरणासारखा आहे. नम्र आणि सभ्य अतिथीसारखा तो आपल्याला भेटण्यासाठी दाराशी उभा असतो. बंद दारातून सूर्याची किरणे आत येऊ शकत नाहीत. पण दार थोडे जरी किलकिले केले की, प्रकाश किरणांचा झोत आत येतो. सारे घर उजळून निघते. आपण आपल्या श्रद्धा आणि भक्तिभावाने आपल्या मनाचे दार किलकिले केले की, तो तेजस्वी परमात्मा आपल्या मनात असाच प्रवेश करतो आणि अवघे जीवन तेजस्वी आणि दिव्य बनवतो. माणसाच्या मनात जन्मोजन्मी अज्ञानाचा अंधार ठासून भरलेला आहे. हा अंधार दूर सारण्यासाठी प्रकाशाची गरज आहे, पण संकुचित मानवी मनाला हेच समजत नाही. मनात श्रद्धेची ज्योत तेवत ठेवली की, त्याने मनोमंदिराचा गाभारा उजळून निघतो. श्रद्धा, भक्ती, प्रेम, परोपकार, दया इत्यादी सद्गुणांनी अंत:करण भरून निघते. अज्ञान-अहंकार, ममतारूपी अंधकार विलयास जातो आणि मनोमनी ज्ञानाचा सूर्योदय होतो.

✸ मनरूपी झाडाची काळजी एखाद्या कुशल माळ्याप्रमाणे करावी लागते. बागेत एखादे सुंदर झाड वाढलेले असते, त्यामागे माळ्याचे परिश्रम असतात. माळी त्या झाडाला स्वत: खत पाणी घालून त्याची उत्तम जोपासना करतो. काही प्रसंगी त्या झाडाच्या आडव्या आणि बेढब वाढलेल्या फांद्या कापून टाकतो. त्या झाडाला सुंदर आकार देतो आणि ऊन-वारा पाऊस सहन करण्याची क्षमता येईपर्यंत त्याची निगा राखतो. अगदी त्याचप्रमाणे माणसाने आपल्या मनरूपी झाडासाठी काळजी घ्यायला हवी. मनाला सुविचारांचे खत-पाणी वारंवार द्यायला हवे जेणेकरून त्यास कुविचारांची कीड लागणार नाही. त्यावर शुभ संकल्परूपी औषध फवारणी करावी. काही प्रसंगी विकल्प, संशय, अविवेकरूपी आडव्या-वाकड्या - बेढब फांद्या फुटतात. त्या तर्कशुद्ध निश्चयरूपी कात्रीने कापून सुख-दु:खात समर्थपणे उभा राहणारा मनरूपी वृक्ष उभा करावा.

✸ मनाला उपमा द्यायची तर ती स्वच्छ पाण्याची देता येईल. स्वच्छ पाणी 'जसा संग तसा रंग' असे असते. चुकीच्या सवयीमुळे पाणी गढूळते. माती, घाण, जंतू असलेले पाणी कितीही तहान लागली तरी काय उपयोगाचे? अशा पाण्याच्या सेवनाने रोगच होतील. तसेच मनही जर वाईट विचार आणि विकारांनी अशुद्ध झाले असेल तर तेही शरीराला अशुद्ध करते आणि मानसिक रोग जडवते. मन दूषित होते ते दोन कारणांनी. खोटारडेपणा आणि संशयी वृत्ती यामुळे मन रोगट होते. मनाच्या स्वच्छ जलाशयात हे दोन खेकडे फिरून तळातला सर्व गाळ हलवून ते जलाशय गढूळ करतात. म्हणून खोटेपणा आणि संशय यांना हटवून मनाचा मानस-सरोवर स्वच्छ ठेवावा.

✸ मन म्हणजे जीवनरथाचा सारथी. मन म्हणजे इंद्रियांचा स्वामी. ज्याला मन आहे तो मनुष्य. मन जिंकाल तर जग जिंकाल. मन माकडासारखे चंचल असते. मन वाऱ्यासारखे कुठेही जाते-येते आणि सूक्ष्मरूपाने प्रवेश करते. मन हे भूतकाळात आणि भविष्यकाळात मुक्त संचार करते.

मन पाखरू पाखरू। दाही दिशा शके फिरू।
देह असो बंधनात। आमुचे मन असो मुक्त।

अशी मनाविषयी कितीतरी वचनं आपण नेहमीच बोलतो आणि ऐकतोही. मनाची महती आपण नानाप्रकारे वर्णन करतो. मनाच्या साहाय्याने माणूस सिकंदर होतो किंवा कलंदर होतो. मनच माणसाला मस्त बनविते अथवा स्वस्त (हलके) बनवते. असे हे मन आहे तरी कसे? जाणण्यास मात्र कठीण आहे.

तर मन हे पिसाट वाऱ्यासारखे आहे. त्याच्या विविधतेचे आविष्कार येथे सादर करण्याचा एक अल्पसा प्रयत्न करण्यात आला. हे मन आहे तरी कसे? हे जाणायचे असेल तर त्यासाठी आवश्यक आहे संतांचा सहवास आणि पूर्ण ब्रह्मज्ञानी सद्गुरूचे मार्गदर्शन. संतांच्या सहवासात मनाला पावित्र्य लाभते. तर सद्गुरूच्या मार्गदर्शनाने चंचल मनाला आवर घालू शकतो.

कु. भारती नारायण आंबेरकर,
मालवण, जि. सिंधुदुर्ग

युगप्रवर्तकाची दिव्य वाणी

...युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी

✸ आपले सर्व प्रचारक आणि विचारदंत प्रत्येक पुरातन महापुरूषाचे नाव आदर-सत्काराने घेतात आणि त्यांच्या कार्याचा उल्लेखही मोठ्या प्रेमाने करतात. तरीही कित्येकदा सत्य व्यक्त करताना मुखातून अशी एखादी गोष्ट बाहेर पडते जी ऐकणाऱ्यांसाठी सत्य असूनही ती कटू असल्याची जाणीव होते. आपल्या कोणत्याही महापुरूषाच्या मुखातून अशी कोणतीही गोष्ट निघू नये जेणेकरून दुसऱ्यांना दु:खाची जाणीव होईल, एखाद्याचे मन दुखावेल या गोष्टीकडे आपल्याला विशेष ध्यान देण्याची गरज आहे. नव-नवीन ऐकणारे आमच्या मुखातून बाहेर पडणारे एखादे वाक्य किंवा एखादा शब्द पकडतात आणि ते वाक्य किंवा त्या शब्दाच्या वादविवादाचे गुऱ्हाळ चालवतात. म्हणून प्रत्येक वेळी प्रत्येक बोलणाऱ्याने ध्यानात ठेवावे की, बोलताना त्याच्या मुखातून अगदी तोलून-मापून शब्द यावेत आणि बोलण्याच्या पध्दतीत इतका गोडवा असावा की ऐकणाराही अगदी प्रभावित होईल. शब्दांच्या खऱ्या भावनेत तर कोणतेच अंतर नसते, परंतु बोलण्याच्या पध्दतीमुळे फार मोठे अंतर पडते. जसे, आपले वडील कुठे आहेत किंवा तुमच्या आईचा नवरा कुठे आहे? दोन्ही वाक्यात आपण एकच गोष्ट विचारली आहे, परंतु पहिल्या वाक्यात विचारलेली पध्दत योग्य आहे. म्हणून बोलण्याच्या बाबतीत विशेष सावधानी बाळगण्याची गरज आहे.

✸ खर्चाच्या बाबतीत आपला फक्त एकच दृष्टिकोन असायला पाहिजे की, मिशनचा पैसा हा आपला असून आपल्या काबाडकष्टाची कमाई आहे हीच धारणा आपल्या मनात बाळगली तर वायफळ खर्च होऊच शकत नाही. हा पैसा आपला नाही, दुसऱ्या कोणाचा तरी आहे असं आपण जर समजत असू तर मग अनुचित खर्चही होऊ शकतो. आम्हाला लहान-सहान वस्तूसाठी देखील मोठे ध्यान आणि मर्यादापूर्वक खर्च करायला हवा. आपल्या मिशनच्या प्रतिष्ठेची शोभा वाढविण्यासाठी अपार कष्ट आणि धावपळीसह पैशाची बचत करण्याकडेही ध्यान दिले पाहिजे.

✸ एक इशारा म्हणून मी वारंवार सांगत आहे की, जर साधसंगतकडून आपल्याला एखादे पद सोपविले असेल तर आपण आपणास त्या योग्य बनवण्याचा प्रयत्न करा. फक्त साधसंगतच नव्हे तर शेजारी-पाजाऱ्यांनाही इतके काही प्रेम द्या की ते देखील आपलेच बनण्यास राजीखुशी होतील. जसा आपला निराकार विशाल आहे तसे आपले हृदयही विशाल बनायला पाहिजे. घसरणाऱ्याला सावरणे, पडणाऱ्याला उठविने आणि प्रत्येकाबरोबर सुख-दु:खाचे वाटेकरी होणे हेच आपले मिशन आहे.आपल्याला अधिकाधिक सत्संग करायला पाहिजेत. आपल्या मुलांना सत्संगाची प्रेरणा देऊन त्यांना धार्मिक ग्रंथांचे वाचन करण्याची सवय लावायला पाहिजे. यामुळे मुलांमध्ये भक्तिभावना वाढीस लागेल. म्हणून मुलांनी रामायण, गीता, गुरुवाणी इत्यादींच वाचन करणे गरजेचं आहे आणि याकडे जास्त ध्यान देणे आवश्यकही आहे.

मनाची दिशा

आज समाजात डोकावून पाहिलं तर अशांती, वैर, घृणा, ईर्ष्या, नफरत यांचा जोम अवास्तव वाढला आहे. अर्थात मनुष्याच्या वैयक्तिक जीवनावर, सुखावर अशा प्रवृत्तींचा परिणाम जाणिवपूर्वक होत असतो. यास्तव मनुष्य दु:खग्रासित, कष्टीत आणि व्याकुळ अवस्थेत जीवन जगत आहे आणि धडपड करुन मार्ग शोधत असतो. माणूस अशा जाचातून सुटण्यासाठी अविरत प्रयत्न करत आहे, जेणेकरून शाश्वत सुख आणि शांती समाधान मिळेल.. परंतु ज्याप्रमाणे पाण्याचे कारंजे जर बंद करायचे असेल, तर कारंजाचे उडणारे पाणी जोरजोरात दाबत बसणे हा त्यावरील उपाय नसून त्या कारंजाच्या मुळाशी जो नळ आहे त्या नळाचा वॉल बंद करणे होय. तद्वतच मनुष्य जीवनात जे दु:खाचे सावट पसरले आहे, त्याचे मूळ कारण म्हणजेच त्या असह्य होणाऱ्या दु:खाची उत्पत्ती कुठून होते? याचा ठावठिकाणा शोधून त्यास प्रतिबंध करणे गरजेचे आहे.

समाजात ज्या दुष्ट प्रवृत्तींना वाव मिळत आहे, त्याला दुसरे तिसरे कारण नसून स्वत: मनुष्याच्या कृतीतून निघणारे विध्वंसक कार्य! म्हणजेच ज्यावेळी मनुष्य कोणतीही कृती करतो त्यावेळी ती मनुष्याच्या अंत:करणात प्रथमत: निर्माण होते. मगच ती त्याच्या अवयवांद्वारे व्यक्त होते. जसे,

``Mind moves from thought to thing."

ज्याप्रमाणे विचार मनामध्ये घोळतात, त्याप्रकारे जीवनाला आकार प्राप्त होतो.

म्हणूनच मनाला योग्य दिशा देणे, सुविचारांचे, सद्विचारांचे खतपाणी देणे व त्यातून परस्पर प्रेमभावनेचा झरा निर्माण करून इतरांना तृप्त करणे यातच सौख्य आहे.

सामान्यपणे समाजात जीवन व्यतीत करताना जो माणसा-माणसामध्ये पाहण्याचा दृष्टिकोन आहे तो सकारात्मक आणि सुभावनात्मक असेल तर बाह्य वादविवादातून, कलहातून होणारी अशांती कमी होऊ शकते.

ज्याप्रमाणे एखादा पेला पाण्याने अर्धा भरलेला असेल, तर तो पाहून 'तो अर्धवट रिकामा आहे' हा नकारात्मक दृष्टिकोन होतो; पण 'तो अर्धा भरलेला आहे' हा सकारात्मक दृष्टिकोन होतो. म्हणून लाभाची शक्यता व्यक्त होते. अर्थात पेल्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातून त्याची विशेषता कळते. तद्वत आपल्या सहवासात असलेल्या माणसाच्या अंगी किती अवगुण, दुर्गुण आहेत? तो कशाप्रकारे जीवन जगतो? त्याच्यात किती खुळचट वृत्ती आहेत? हे डोकावून पाहणे व त्यासंबंधी विचार करणे तितकेसे महत्त्वाचे नाही, तर त्याच्याकडून चांगले कार्य होते का? त्याच्यामार्फत होणाऱ्या प्रत्येक कृतीतून होणारे सत्कार्य आम्हाकरिता काही प्रेरित करते का? या गोष्टी आत्मसात करून, त्याच्याबद्दल सहानुभूती दाखवून त्याला आपलंसं करणे हितावह ठरेल. त्यातूनच परस्पर मनांचे पवित्र संबंध जोडता येतील. जेणेकरून वाद-विवाद, कलहातून होणारे प्रसंग, दुर्घटना यांना प्रतिबंध होऊन एक शांती प्रस्थापित करण्यास मार्ग सुलभ होईल.

ज्याप्रमाणे बोरीचे झाड कितीही काटेरी असले तरी त्या काट्यांचा आम्हाला विचार करायचा नाही, तर त्यापासून मिळणारी बोरे किती स्वादिष्ट आहेत हे जाणावयाचे आहे किंवा मधमाशी ही जशी मध गोळा करण्यासाठी निरनिराळ्या सुगंधी फुलावर बसून मकरंद गोळा करते, तशीच ती घाणीवर किंवा दुर्गंधीवर बसते. पण त्यावेळी दुर्गंधी शोषून न घेता मधास योग्य असलेला स्वादच गोळा करत असते. तद्वतच प्रत्येक मनुष्यात इतरांकडे पाहण्याची दृष्टी ही सकारात्मक

आणि प्रेमभावनेची असेल तर साहजिकच एकमेकांना आदर सत्कार देण्यास किती विलंब लागेल ? सुख हे इतरांना आनंद देण्यातच आहे. जो इतरांच्या भल्याची जितकी कामना करतो तेवढेच सुख त्याच्या पदरी आपोआप प्राप्त होते. ज्याप्रमाणे कोणतीही बँक अथवा वित्तिय संस्था ग्राहकाला कोणतेही कार्य साध्य करण्याकरिता कर्ज पुरविते अर्थात ग्राहकाच्या भल्याची अपेक्षा करत असते. पण त्याचवेळी त्या ग्राहकाच्या भल्यामुळे ग्राहकांकडून मिळणाऱ्या कर्जाच्या व्याजावर त्या बँका अथवा वित्तिय संस्थांना दुप्पट-तिप्पट लाभ मिळणारा असतो. त्यातून अशा बँका अथवा संस्था विकसित होतात.

म्हणून जर शाश्वत सुख मिळवायचे असेल तर माणसाच्या मनाची वैचारिकता बदलणे गरजेचे आहे. मन हे इतके बलिष्ठ आणि दुराग्रही आहे की, ते जरी बुद्धीच्या अधीन असले तरी ते कधी कधी बुद्धीवरही प्रभुत्व गाजविते. व्यवहारी जगात अनेक विरोधी शक्तींचा सामना करावा लागणाऱ्या मनुष्याला मन संयमित करणे निश्चितच अत्यंत कठीण आहे; कारण मनाला नियंत्रित करणे वादळी वाऱ्याला नियंत्रित करण्याहूनही कठीण आहे. वेदांमध्ये लिहिले आहे.

आत्मानं रधिनं विद्धि शरीरं रथमेवच
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेवच।
इन्द्रियाणि ह्याना हुविर्षयांस्तेषु गोचरान्
आत्मेन्द्रियमनोयुक्तं भोक्ते त्या हुर्मनीषिणः।।

(कठोपनिषद १.३.३ - ४)

''भौतिक देहरूपी रथामध्ये जीव हा स्वार आहे आणि बुद्धी ही त्याची सारथी आहे. मन हे लगाम आहे आणि इंद्रिय घोडे अहेत. याप्रमाणे जीव हा मन आणि इंद्रियांच्या सहवासात सुख किंवा दुःख उपभोगतो, असे महान विचारवंत समजतात.''

म्हणून मन हे चंचल वृत्तीचे असून ते बंधमुक्त असल्यामुळे लोभ लालसेमुळे, स्वार्थामुळे किंवा हव्यासापोटी नियंत्रित रहात नाही.

मनाला आवर घालण्याचे काम मानसशास्त्रज्ञ, डॉक्टर, विद्वान, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, भूगर्भशास्त्रज्ञ अथवा कोणी सामान्य व्यक्ती करू शकत नाही, त्याला एकमात्र उपाय साधुसंतांची संगत धरणे आवश्यक आहे. निराकार तत्त्वाशी एकसंध होणे गरजेचे आहे.

आता कोठे धावे मन। तुझे चरण देखिलिया।
भाग गेला शीण गेला। अवघा झाला आनंद।।

मनाची दिशा बदलण्याकरिता प्रभूनामात, भक्तिरंगात मनाला विसावा देणे आवश्यक आहे. मनामध्ये भगवद्भक्ती जागृत झाल्यावर माणसामाणसामधील परस्पर भेदभाव समूळ नष्ट होतो. माणसाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निर्भेद, निर्विवाद बनतो. जेणेकरून वास्तव जीवनात कलह सदृष्य, वादसदृष्य घटनांना आपसुकच प्रतिबंध येतो.

ज्याप्रमाणे हिरव्या रंगाचा चष्मा घातल्यावर सारं काही हिरवंच दिसतं. त्याप्रमाणे मनातील विचारांना योग्य दिशा मिळाली तर आचार शुद्ध बनतील, कर्म चांगले बनतील. स्वाभाविकच जीवनात प्रेममय, आनंदमय, वातावरण बनेल. जर स्वतः सुखी बनलो तर जग सुखी होईल. जसे दिवा प्रकाशित झाला तर त्याचा प्रकाश दूरपर्यंत पोहचावा लागत नाही तर तो आपोआप पोहचतो.

तर आज सद्य परिस्थितीचा विचार करून समयाचे सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज जगाला सुखी करण्यासाठी निराकार तत्वाचा बोध करून मनाची दिशा बदलण्याचे कार्य करत आहेत. तरी प्रत्येक मानवमात्रांनी या संधीचा अवश्य लाभ घेऊन जीवनाचे सोने करूया.

- श्री. नितीन लक्ष्मण घुरूप,
विरार (पूर्व)

आत्मज्ञान मंथन

१) समर्थ सद्गुरूजवळ कोणत्या उद्देश-पूर्तीची इच्छा करणे उचित आहे?
(अ) आरोग्य, (ब) नामधन,
(क) धन-संपत्ती (ड)तंत्र-मंत्र

२) संत-महात्मे कोणता परोपकार करतात?
(अ) धन-दौलत देतात, (ब) घरदार बनवून देतात, (क) धर्मशाळा बांधून देतात,
(ड) ब्रह्मज्ञान प्राप्ती करून देतात.

३) सत्संग, सेवा, नामस्मरणापूर्वी प्रथम कोणती गोष्ट प्राप्त करणे आवश्यक आहे?
(अ) ब्रह्मज्ञान प्राप्ती, (ब) संत महात्म्य ऐकणे,
(क) गुरूदर्शन, (ड) कर्मकांड

४) ज्ञानप्राप्तीचा भावार्थ कोणता?
(अ) प्रवचन करणे, (ब) ग्रंथ वाचन करणे,
(क) प्रत्येक क्षणी परमात्म्याची जाणीव ठेवणे
(ड) गुरूची पूजा-अर्चना करणे.

५) नामस्मरणाचे पूर्ण स्वरूप कोणते आहे?
(अ) निराकारात साकाराला आणि साकारात निराकाराला पाहणे, (ब) सकाळी ऊठल्याबरोबर आणि रात्री झोपण्यापूर्वी तूही निरंकार जपणे,
(क) सामूहिक स्मरण करणे, (ड) एकमेकांस धन निरंकार करणे.

६) जर आपल्या ज्ञानात दृढता नसेल तर आपली कोणती हानी होईल?
(अ) सेवेची, (ब) मायेची,
(क) भक्तीची (ड) नावलौकिकाची.

७) सेवा करण्याचे खरे मूळ कोणते?
(अ) वर्दी घालून चांगले सेवा कार्य करणे,
(ब) सद्गुरूच्या आदेशाचे पूर्णपणे पालन करून सेवा करणे, (क) रक्तदान करणे,
(ड) प्रवचन करणे.

८) सत्संगात जाण्याची आवश्यकता कोणती?
(अ) मनमर्जीपासून वाचण्याची, (ब) भौतिक सुख प्राप्तीसाठी, (क) यश प्राप्तीसाठी
(ड) मानवी मनावर आत्म्याचा ताबा ठेवण्यासाठी

९) सर्व भ्रमांची समाप्ती कशाने होते?
(अ) ब्रह्मप्राप्तीने, (ब) सत्संग करण्याने,
(क) ग्रंथवाचनाने, (ड) सेवा केल्याने

१०) सत्संगात झोप कोणाला येते?
(अ) अशक्तास, (ब) श्रद्धाहीनास,
(क) थकलेल्यास,(ड) मायेत गुंतलेल्यास.

११) मानवाचे सर्वात मोठे धन कोणते?
(अ) कुटुंब, (ब) आरोग्य,
(क) आचरण, (ड) पदार्थ

१२) ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर सर्वात जास्त आवश्यक गोष्ट कोणती?
(अ) गुरुदर्शन, (ब) सत्संग,
(क) सेवा, (ड) विश्वास

१३) सत्संगामुळे कोणती गोष्ट जागृत होते?
(अ) अहंकार, (ब) विवेक, (क) मन, (ड) बुद्धी

१४) धुनी म्हणताना आपली मनोवस्था कोणत्या गोष्टीकडे असायला हवी?
(अ) घरातील मुलांकडे, (ब) कौटुंबिक गोष्टींकडे, (क) घरी लवकर कसे जाऊ याकडे,
(ड) निराकाराकडे

१५) 'सत्य' काय आहे?
(अ) ईश्वर, (ब) सृष्टी,
(क) माया, (ड) पाणी.

१६) चरणस्पर्श करून 'धन निरंकार' करण्यामागे कोणता भावार्थ आहे?
(अ) वडीलधाऱ्यांचा आदर, (ब) भाग्यरेषा बदलते, (क) आत्मा परमात्म्यापुढे झुकतो,
(ड) पोटाला व्यायाम मिळतो.

श्री गुरुवचनामृत

(शनिवार दि. २१ मार्च २००९ ला राष्ट्रीय स्तरावर आयोजित नेपाळच्या संत समागमात विशाल जनसमूहाला उद्देशून निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी केलेल्या प्रवचनाचा मराठी अनुवाद.)

मूळ संग्राहक - **सुलेख 'साथी' (दिल्ली)**

मराठी अनुवाद - **कैलास कुटे**

संत जनांनो, प्रेमाने बोला धन निरंकार

संत जनांनो, बऱ्याच वर्षानंतर आज पुन्हा नेपाळमध्ये या संत समागमाच्या निमित्ताने येण्याचा योग आला, जिथे आपण सर्वजण उत्साहपूर्वक उपस्थित झाला आहात. संत-महापुरुष नेहमीच अशा प्रकारची इच्छा व्यक्त करतात की, जसं आज हे सुंदर वातावरण बनलेलं आहे अशाच प्रकारचं वातावरण नेहमीच सर्वत्र पहायला मिळो.

नेपाळमध्ये समागमच्या निमित्ताने येण्याचा योग फार कमी वेळा आला. इथे टिकापूरमध्येच पहिल्यांदा समागम करण्याचा योग आला, त्यालाही खूप वर्षे झाली. जवळ-जवळ १०-११ वर्षे झाली असतील. त्यानंतर काठमांडूलाही समागम करण्याचा योग आला. तसं पाहिलं तर बऱ्याच वर्षांपूर्वी संत समागम व्यतिरिक्त टिकापूर येथे येण्याचा योग आला होता. त्यानंतरही मध्ये पुन्हा एकदा असाच योग आला होता. त्यानंतर मध्ये बराच काळ निघून गेला. मागेही जेव्हा महेंद्र नगर येथे नेपाळचा समागम झाला तेव्हाही सुंदर रूप पहायला

मिळालं; परंतु आता जे सुंदर रूप पहायला मिळत आहे ते पाहून खरोखरच खूप आनंद होत आहे. ज्या उत्साहाने युक्त होऊन आपण इथे उपस्थित आहात, खरोखरच त्याचा एक परिणाम म्हणून प्रत्येक जण आनंदीत दिसत आहे. जसं की अन्य भाषा-भाषिक लोक या सत्याशी नातं जोडून आपलं कल्याण करत आहेत; त्याचप्रमाणे अनेक स्थानांवर नेपाळी भाषा बोलणाऱ्या संतांचंही दर्शन होत आहे. जरी अनेक वर्षे नेपाळमध्ये येण्याचा योग आला नसला तरी सुद्धा त्यांचं दर्शन होत होतं. त्याचप्रमाणे जेव्हा जेव्हा मुंबईला जाण्याचा योग आला तेव्हाही कित्येक वर्षांपासून सेवारत असलेले नेपाळचे महापुरुष पहायला मिळाले. परंतु कित्येक वर्षानंतर पहिल्यांदा जेव्हा नेपाळमध्ये येण्याचा योग आला त्यानंतर सहजरूपाने विस्तार वाढत गेला आणि इथे टीकापूरमध्ये विद्यादानाच्या हेतूने एक शाळाही उघडली गेली. आध्यात्मिक शिकवणीबरोबरच समाजात विचरण करण्यासाठी अनेक प्रकारचं ज्ञान असावं म्हणून इथे नेहमीच शिक्षणाला महत्त्व दिलं गेलं. तर अशा पद्धतीनेसुद्धा मिशनकडून या शाळेच्या रूपात एक set-up केलं गेलं. अशा प्रकारे भक्त-महापुरुष सामाजिक सेवेबरोबरच जीवनाचा आध्यात्मिक पैलू मजबूत करण्यासाठीही योगदान देतात. प्रत्येक मानवाला जीवनाचा उद्देश्य काय आहे? या जन्माला हीऱ्यासारखा अनमोल का म्हटलं आहे? याची जाणीव करून देतात. या धरतीवर वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक मानवाने, भले मग तो रंगाने काळा असेल अथवा गोरा असेल, कोणतीही भाषा बोलणारा असेल, ज्याचं शरीर आहे, आत्मा आहे त्याच्या आत्म्याने आपल्या मूळ स्वरूप परमात्म्याला जाणायचं आहे. आत्म्याचा उद्धार करण्यासाठी आजही महापुरुष संदेश देत आहेत. नेपाळी भाषेत आणि हिंदी भाषेत आपण तो संदेश श्रवण केलात, जो आपलं ध्यान इकडेच केंद्रित करत होता की -

बडे भाग मानुष तनु पावा
सुर दुर्लभ सब ग्रंथही गावा।

हा मानव जन्म मिळाला आहे तर असा अनमोल जन्म प्राप्त करून आपण आपल्या आत्म्याचं कल्याण करायचं आहे. म्हणूनच एक सुवर्ण संधी म्हणून त्याच्याकडे पाहिलं जातं. जोपर्यंत या मानव जन्माची प्राप्ती नव्हती तोपर्यंत आपण जन्म-मरणाच्या बंधनात अडकलो होतो. मानव जन्म मिळाल्यानंतरच आवागमनाच्या बंधनातून सुटका होऊ शकते. ब्रह्मज्ञानी महापुरुषांची संगत आणि ज्ञानदृष्टी मिळाल्यानंतर आत्म्याचे सर्व भ्रम संपून जातात.

माणसाच्या रूपात बरेच जण जन्माला येतात, पण प्रत्येकाचा उद्धार होत नाही. कारण प्रत्येक जण या गोष्टीकडे लक्ष न देता संसार आणि सांसारिक गोष्टींपर्यंतच मर्यादीत रहातात. कित्येक जण तर भोगामध्येच लिप्त होऊन संपूर्ण आयुष्य वैर, इर्षा, विरोधाच्या भावाने युक्त होऊन रहातात. अशाप्रकारे समजा की दुर्गंधीयुक्त चिखलामध्येच संपूर्ण जीवन घालवतात.

याच नेपाळमध्ये, ज्यांनी 'अहिंसा परमो धर्मः' असं म्हटलं; अहिंसा, प्रेम, बंधुत्व, शांतीची स्थापना करण्याचा प्रयत्न केला त्या भगवान गौतम बुद्धांचीही चर्चा केली जाते. अशा भावनेने युक्त असणारे या धरतीसाठी वरदान ठरतात. परंतु जे वैर, इर्षा, विरोधाच्या भावनेने युक्त राहतात, संसार आणि

मायेला महत्त्व देतात, दानवतेच्या मार्गाने चालतात, त्यांचं जीवन एखाद्या दुर्गंधीयुक्त चिखलाप्रमाणे होते. ते धरतीसाठी वरदान न बनता शाप बनतात. युगानुयुगापासून महापुरुषांचं एकच उद्दिष्ट होतं की, जर मानवाच्या रूपाने एक उत्तम जन्म मिळाला, सर्व योनींमध्ये त्याला सर्वश्रेष्ठ मानलं जातं, तर मग माणूस दानवतेच्या मार्गाने का जातो? त्याला मानवाच्या रूपात येऊन देवता व्हायचं आहे. इतरांचं नुकसान व्हावं अशी वृत्ती ही राक्षसी वृत्ती असते. असे लोक इतरांचं नुकसान करून त्याचा आनंद साजरा करतात. कोणत्या महापुरुषाने अथवा गुरू-पीर-पैगंबर, धार्मिक ग्रंथांनी ही मानवाची ओळख आहे असं सांगितलं नाही. परंतु आज अज्ञानतेचा इतका जोर आहे की, आपल्या स्वार्थपूर्तीसाठी माणूस निष्पाप लोकांवर जुलूम करतो आणि अशी लांछनास्पद कृत्य करूनही तो असा विचार करतो की मी सर्व श्रेष्ठ कर्म करत आहे. त्याला हे कळत नाही की, तो अंधारामध्ये आहे, अज्ञानामध्ये आहे आणि ज्याला चांगलं मानत आहे, वास्तविक पहाता तो त्याला भटकवणारा आणि अधःपतनाकडे नेणारा मार्ग आहे. संत-महापुरुष वेळोवेळी उपकार करून माणसाला जाणीव करून देतात, त्याला अज्ञानाच्या निद्रेतून जागृत करून त्याचं जीवन प्रकाशित करतात. ज्ञानाचा प्रकाश देऊन आत्म्याला त्याच्या मूळ स्वरूपाची प्राप्ती करून देतात आणि त्याला त्याच्या सत्य स्वरूपाची जाणीव करून देतात. अशाप्रकारे प्रत्येक मानवाचा उध्दार करण्याच्या दृष्टीने महापुरुष परोपकार करतात. ते सत्याचा संदेश देऊन सत्याशी जोडून मानवमात्रावर उपकार करत आहेत. आज या संत-समागमाचाही हाच उद्देश्य आहे की, एक तर हा सत्य संदेश दिला जावा आणि दुसरं म्हणजे धर्म कशाला म्हणतात याची जाणीव करून दिली जावी. धर्मग्रंथांमध्ये जी धर्माची परिभाषा सांगितली गेली आहे, ती तर लोक विसरून गेले आहेत आणि न जाणो इतर परिभाषा कुठून आल्या आहेत? आणि त्या प्रमाणेच माणसं आचरण करून जीवन जगत आहेत. त्याचाच परिणाम अज्ञानाच्या अंधःकारातच जन्म झाला आणि संपूर्ण जीवनही अज्ञानाच्याच अंधःकारात घालवलं; ना आत्म्याचं

कल्याण झालं, ना मानवतेच्या मार्गाने जाऊ शकलो. दोन्हीही बाजूने नुकसान झालं. ना आत्म्याचं कल्याण झालं, ना आपण मानव म्हणण्यास लायक झालो. अशाप्रकारे जन्माचं सार्थक न होता लोक-परलोक दोन्हीही हातातून निघून जातात. म्हणूनच महापुरुष म्हणतात की, माणसाने लोक आणि परलोक दोन्हीही सुखमय करावेत.

भले मग तो नेपाळच्या एखाद्या भागात रहाणारा असो, हिंदुस्थानाच्या एखाद्या प्रांतात राहणारा असो, अमेरिकेचा असो, कॅनडाचा असो, चीन, जपान, कोरिया, तैवान, मध्य पूर्व देशात राहणारा असो, धरतीवर कुठेही रहाणारा असो, प्रत्येक माणसाच्या जीवनात हा ज्ञानाचा प्रकाश यावा. माझं मूळ स्वरूप काय आहे हे प्रत्येकाने जाणावं. ही सर्व निर्मिती प्रभू-परमात्म्याचीच असून ती वैर-विरोध करण्यासाठी नसून प्रेम करण्यासाठी आहे ही समज प्राप्त करून घ्यावी. Love is God हे केवळ वाचण्या-ऐकण्यासाठी नाही ही समज ज्यांना येते ते प्रेमाच्या मार्गाने चालायला सुरूवात करतात. त्यांचं जीवन प्रकाशित होतं. त्यांना ही समज येते की आपण प्रेमाने युक्त होऊन जीवन जगायचं आहे. आपल्याला जर प्रेम करता आलं तरच आपण धार्मिक होऊ शकतो. मानवमात्राच्याप्रति कल्याणाचा भाव ठेवला तरच आपण धार्मिक आहोत आणि जर या उलट वैर-इर्षा, द्वेषाची भावना असेल, जाती-पातीच्या नावाखाली वैर करणं, इतरांना तुच्छ मानून स्वतःला श्रेष्ठ मानणं, या अहंभावनेने युक्त होऊन जर जुलूम-जबरदस्ती अथवा हिंसा करत असलो तर याचा अर्थ वास्तविक धर्म काय आहे तोच आपल्याला समजला नाही. म्हणूनच संत-महापुरुष-भक्तजन मानवाला आजही संदेश देत आहेत की तू हे सत्य जाणून घे, जीवनात असा ज्ञानाचा प्रकाश प्राप्त कर की, ज्यामुळे आत्मा आणि मन दोन्हीही प्रकाशमान होतील. अशाप्रकारे संत-महापुरुषांची वाणी भले मग ती रामचरितमानस मधली असो, गीता, गुरबाणी किंवा मग बायबल मधली असो, प्रत्येक ठिकाणी आपल्याला हाच संदेश मिळेल; कारण सत्य हे सत्यच आहे. Universal Truth ज्याला आपण म्हणतो, Universal म्हणजे संपूर्ण विश्वासाठी जे आहे ते Universal Truth (अटळ सत्य) आहे, वैश्विक सत्य आहे. म्हणूनच जे Universal (सार्वभौम) आहे असं सत्य आपण जाणायचं आहे. Universal म्हणजे अशी एक भावना जागृत व्हावी की, 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणजे संपूर्ण धरती, विश्व एकच कुटुंब, एकच परिवार आहे. ते Universal basis म्हणजेच सर्व विश्व यावरच आधारित आहे. गुरू-पीर-पैगंबरांचे आदेश उपदेश

की हा परमात्मा हेच एक वैश्विक सत्य आहे, जो निराकार आहे कणाकणात व्यस्त आहे -

जिमी जमान के विखै सम्मसति एक ज्योत है।

या परमतत्त्वाची ओळख आपण करायची आहे, ज्याला आपण रामही म्हणतो, अल्लाही म्हणतो, गॉडही म्हणतो, अकालपुरुषही म्हणतो, ईश्वरही म्हणतो, विट्ठलही म्हणतो आणि आज याला निराकार या नामाने संबोधित केलं जात आहे म्हणूनच मिशनचं नाव निरंकारी मिशन आहे.

निर्मल, निराकार, निर्मोहा
नित्य निरंजन सुख सन्दोहा।

हा निराकार आहे - Formless God म्हणजेच आकाररहित परमसत्ता आहे. Universal Truth (वैश्विक सत्ता) आहे. हे कोणत्या एखाद्या सांसारिक सत्याप्रमाणे नाही की, सकाळी काही आहे तर संध्याकाळी वेगळंच आहे. आज काही आहे तर काही वर्षांनंतर आणखी काही वेगळंच आहे. हे सत्य वातावरणासारखं नाही की, कधी गरमी आहे तर कधी थंडी आहे. कधी पूर आहे तर कधी दुष्काळ आहे. हे शाश्वत, एकरस राहणारं सत्य, ज्याला निराकार परमात्मा, God अल्लाह म्हटलं जातं, ही सदैव एकरस राहणारी परमसत्ता आहे. कोणत्या अशा एकाच स्थानावर नाही की, कुठे बनारस, काशी किंवा हरिद्वार येथे आहे किंवा मग कोणत्या पर्वतावर किंवा मग एखाद्या वाळवंटी भागात आहे; असं नाही तर हा कणाकणात आहे -

हर जर्रे में किस शान से तुम जलवानुमा हो....

प्रत्येक ठिकाणी, कणाकणात परमात्मा व्यापक आहे. आपण वाचत-ऐकत आलेलो आहोत की, एकच ज्योत आहे, जी सर्वत्र सामावलेली आहे. ज्यांना ब्रह्मज्ञान प्राप्त झालं आहे अशा ब्रह्मज्ञानी महापुरुषांचं हे वक्तव्य आहे. तेच म्हणत आहेत की -

जिधर देखता हूँ उधर तू ही तू है,
हर शै में जलवा तेरा हू ब हू है।

ज्ञानी महापुरुषांची नजर याला सर्वत्र पहाते तर अज्ञानी लोकांची नजर याला एखाद्या विशिष्ट स्थानावरच पहाते. ज्ञानी महापुरुषांची दृष्टी याला कणाकणात पहाते. म्हणूनच म्हटलं आहे -

सन्तन के मन रहत है सभ के हित की बात।
घट-घट देखे अलख को देखे जात न पाँत।

जेव्हा प्रत्येक घटात याचं दर्शन होतं तेव्हा हा प्रश्न संपून जातो की कोण नेपाळी आहे. कोण

गुजराती आहे, कोण मराठी आहे आणि कोण पंजाबी आहे, मग तर -

माटी एक अनेक भाँति करि साजी साजर हारै।
ना कछु पोच माटी के भांडे ना कछु पोच कुंभारे।

एकाच मातीपासून बनलेले सर्व पुतळे आहेत आणि सर्वांमध्ये एकच नूर (अंश) सामावलेला आहे. म्हणूनच संतांच्या मनात सर्वांच्या हिताचा भाव असतो. कारण 'घट-घट देखे अलख को' जर त्यांना हा ज्ञानाचा प्रकाश मिळाला नसता तर त्यांनाही घटा-घटात हे स्वरूप दिसलं नसतं. मग तेही सांसारिक लोकांप्रमाणे कोणाला आपले तर कोणाला परके समजले असते, कोणाला कनिष्ठ तर स्वतःला श्रेष्ठ समजले असते. त्यांना ही ज्ञानदृष्टी मिळाल्यानेच ते सर्वांच्या हिताचा विचार करतात, प्रत्येकाच्या कल्याणाची कामना करतात. म्हणूनच संत-महापुरुषांची वाणी याच संदेशावर आधारित आहे.

जसं आपण इथे नेपाळी सज्जनांना पहात आहोत की, चेहऱ्याची आकृती, ज्याला आपण म्हणतो की, मंगोलियन फिचर, चीनमध्ये रहाणारे आहेत, जपान, सिंगापूर किंवा फिलिपाईन्समध्ये रहाणारे आहेत, हे सारे विविध विभागात रहाणारे आहेत. त्यांच्या डोळ्यांचं, चेहऱ्याचं स्वरूप तसं नाही, जसं एखाद्या अमेरिकनचं आहे किंवा मग युरोपला राहणाऱ्याचं आहे. आकृती जरूर वेगवेगळी आहे, पण आहेत तर सर्व पाच तत्त्वांचे पुतळे. भले अमेरिकेने खूप प्रगती केली आहे तर मग त्यातला रहिवाशी सहा तत्त्वांनी बनलेला नाही. तिथे राहणारे सुद्धा पाचच तत्त्वांचे बनलेले आहेत. चेहऱ्याची किंवा शरीराची ठेवण कशीही असली, कोणताही रंग असला, कोणत्याही संस्कृतीशी संबंधित असले, कोणतीही भाषा बोलणारे असले तरी ते आहेत मात्र -

माटी एक अनेक भाँति कर ....

एकाच मातीपासून सर्व बनलेले आहेत. पाच तत्त्वांपासून बनलेले आहेत आणि घटाघटात एकाचाच अंश आहे म्हणून या सत्याचा बोध होणं गरजेचं आहे. या सत्याचा जर बोध झाला

तर सर्व भांडणं संपून जातात. अज्ञानाची अधिकता हेच सर्व भांडणाचं मूळ आहे. लोक सत्यापासून अनभिज्ञ आहेत, म्हणून भले मग ते राजा झाले किंवा मग डॉक्टर झाले किंवा मग एखाद्या जमातीचे प्रतिनिधी झाले तरी आजही ते अज्ञानतेमध्ये आहेत. ज्यांच्याशी त्यांचा संबंध आहे त्यांनाही ते त्याच विचारांनी प्रेरित करतात, त्याच दिशेने घेऊन जातात आणि परिणाम काय, तर सर्वत्र अशांती, मार-झोड, म्हणून हा अज्ञानाचा अंधार मिटविणं गरजेचं आहे. ज्ञानाच्या प्रकाशाशिवाय हा अंधार मिटू शकत नाही. जसं सूर्योदय झाल्यानंतर अंधार नाहिसा होतो -

तिमिर गयो रवि देखते -

सूर्याचा उदय झाल्यानंतर अंधार नाहिसा होतो. त्याचप्रमाणे -

कुमति गई गुरू ज्ञान।

गुरूच्या ज्ञानामुळे कुमतीही निघून जाते. हा ज्ञान-प्रकाश ज्याच्या जीवनात येतो तो इतरांसाठीही वरदान म्हणून सिद्ध होतो. सत्याशी अनभिज्ञ असल्यामुळेच ही सर्व भांडणं आहेत. जीवनात प्रकाश नाही, भ्रमात अडकलेले आहेत. अशा प्रकारे अज्ञानात जीवन जगत आहेत. ते सत्य जाणत नाहीत की, सर्वांचं स्वरूप आणि सर्वांचं मूळ अस्तित्व, दृश्य-अदृश्य सर्व काही ज्याच्यामुळे आहे, तो हा प्रभूच अटळ सत्य आहे. निर्मितीमध्ये तर आपण फसून जातो, पण जो निर्माता आहे तो एकच आहे, एकच रचनाकार, एकच कुंभार, प्रत्येकाची अशी भावना बनो हीच महापुरुषांची ईच्छा आहे. जिथे असा भाव नाही, अवस्था नाही, ना ते वास्तविक सत्य धर्माचं पालन करत आहेत, ना ते धर्माची वास्तविक परिभाषा जाणत आहेत की, धर्म कशाला म्हणतात? धर्माची व्याख्या काय आहे? मानवतेच्या मार्गाने न जाता ते अंधारातच धक्के खात आहेत. संत-महापुरुष-भक्त हीच कामना करतात की, सर्व जण अंधारातून बाहेर पडावेत आणि ज्ञानप्रकाशाने युक्त व्हावेत. प्रत्येकाने हे सत्य जाणून या प्रभू-परमात्म्याला आपल्या जीवनात स्थान द्यावं. परमात्म्यापासून अनभिज्ञ असतील तर त्याला जीवनात तरी कसा आणणार? जर तो जीवनात आला नाही तर भांडण तंटे तरी कसे समाप्त होणार? आधीही होत आले आहेत आणि आताही होत आहेत, पण प्रभू-परमात्म्याला जर मध्ये आणलं तर जसं ते उदाहरण बऱ्याच वर्षांनंतर पुन्हा ध्यानात आलं की, एक गृहस्थ वाळवंटी भागात रहात होता. त्याची जी तीन मुलं होती ती कामकाजानिमित्त बाहेरगावी गेली होती. त्या वयोवृद्ध गृहस्थाला जेव्हा जाणीव झाली की मी काही क्षणाचा पाहुणा आहे तेव्हा त्याने विचार केला की माझ्या पश्चात माझ्या संपत्तीसाठी माझ्या मुलांमध्ये भांडण होऊ नये. तेव्हा त्याने आपल्या एका मित्राला बोलावलं आणि सांगितलं की माझ्या पश्चात माझी जी काही संपत्ती आहे ती माझ्या तीन मुलांमध्ये कशी वाटायची ती मी तुला सांगतो. माझी अशी इच्छा आहे की, माझ्या मोठ्या मुलाला माझ्या संपत्तीचा अर्धा भाग द्यावा. दुसऱ्या मुलाला चौथा भाग आणि तिसऱ्या मुलाला पाचवा भाग देण्यात

यावा. त्यानंतर त्या गृहस्थाचा अंत झाला.

काही दिवसांनी जेव्हा तिन्ही मुलं घरी आली तेव्हा वडिलांचा तो मित्र त्या मुलांना भेटला आणि घडलेली सर्व घटना सांगितली आणि सांगितल्याप्रमाणे संपत्तीचं वाटप करायला सुरूवात केली. संपत्तीत वडिलांच्या नावावर जी जमीन होती ती वडिलांच्या इच्छेप्रमाणे वाटण्यात आली. सर्व संपत्तीचं वाटप झालं. पण त्या संपत्तीत काही उंटही होते. त्या उंटांची संख्या होती एकोणीस. आता त्या मित्राला मोठा प्रश्न पडला की नियमानुसार उंटांचंही वाटप केलं गेलं पाहिजे. तर मग त्या एकोणीस उंटांचा अर्धा भाग मोठ्या मुलाला दिला गेला पाहिजे. आता एकोणिस उंटांचा अर्धा भाग कसा करावा? त्याच्या पुढे मोठा प्रश्न उपस्थित झाला. त्याने विचार केला की जर साडे नऊ उंट द्यायचे झाले तर एका उंटाला कापावे लागेल आणि ते मूर्खपणाचे ठरेल. प्रश्न पडला, करू तर काय करू? थोड्या वेळाने उंटावर स्वार होऊन एक माणूस तिथे आला आणि विचारलं की, काय झालं? तेव्हा त्या मित्राने सर्व प्रसंग त्याला सांगितला. तो माणूस म्हणाला ठिक आहे, मी तुमचा प्रश्न सोडवतो. तो उंटावरून खाली उतरला आणि त्या एकोणीस उंटांमध्ये आपला एक उंट सामील केला. उंटाची एकूण संख्या झाली वीस. आता अटीप्रमाणे त्याने त्या वीस उंटांचा अर्धा भाग दहा उंट मोठ्या मुलाला दिले. दुसऱ्या मुलाला त्या वीस उंटांचा चौथा भाग म्हणजे पाच उंट दिले आणि सर्वात शेवटच्या मुलाला त्या वीस उंटांचा पाचवा भाग म्हणजे चार उंट दिले. आता मोठ्या मुलाला दहा उंट, दुसऱ्या मुलाला पाच आणि तिसऱ्या मुलाला चार मिळून एकूण एकोणीस उंटांचं वाटप झालं आणि जो शेवटचा एक विसावा उंट राहिला तो त्याचा त्याच्याकडेच राहिला. इतका मोठा प्रश्नही सुटला आणि त्याचा एक उंट त्याच्याकडे राहिला. त्याचप्रमाणे ब्रह्मज्ञानीही हेच करतात की या निराकाराला प्रत्येक ठिकाणी सामील करतात आणि अशा प्रकारे सर्व प्रश्न सुटतात आणि हा निराकार आहे तसाच रहातो. सांगण्याचा भावार्थ, माणसा-माणसामधले जे भांडण-तंटे आहेत. कुठे धर्माच्या नावाने, कुठे जातीच्या नावाने, कुठे कोणत्या कारणास्तव, तर परमात्मा-ईश्वर-निराकार, हे सत्य जीवनात सामील केलं तर हे भांडण-तंटे समाप्त होतात. जात-पात, हिंदू-मुस्लिम, सिख-ईसाईचा प्रश्न रहात नाही. मग सर्वच एका प्रभू-परमात्म्याची संतान आहे असा भाव जागृत होतो. वैर-विरोध समाप्त होऊन प्रेमाची स्थापना होते आणि म्हणूनच प्रेमयुक्त जीवन जगण्याची प्रेरणा दिली जात आहे. प्रेमाने युक्त होऊन जीवन जगणारेच वास्तविक रूपाने प्रभूप्रेमी असतात आणि तेच धरतीसाठी वरदान सिद्ध होतात. हीच कामना आहे की प्रत्येकाने प्रेमाने जीवन जगावं आणि धरतीला स्वर्ग बनविण्यास योगदान द्यावं.

दास आणखी अधिक शब्दांचा आधार घेणार नाही, कारण वेळही खूपच झालेली आहे. आणखी उद्याचाही दिवस आहे की पुन्हा आपण सर्व एकत्र येणार आहात. आजही अनेक भक्त-महापुरुषांकडून त्यांच्या भावना श्रवण केल्या. भले ते नेपाळच्या वेगवेगळ्या भागातून आले होते, त्यांनीही आपले भाव व्यक्त केले. उद्या पुन्हा आणखी अनेक भक्त-महापुरुषांकडून त्यांच्या भावना श्रवण करायच्या आहेत, ज्या सत्यावर, भक्ती, बंधुभावना आणि मानवतेवर आधारित असतील.

संत जनांनो, धन निरंकार.

संत निरंकारी मंडळाची विशेष जनरल बॉडी मिटींग

केंद्रीय सल्लागार बोर्डाची स्थापना

श्री. गोविंदसिंहजी चेअरमन
तर
श्री. खेमराज चड्ढाजी व्हाईस-चेअरमन
म्हणून नियुक्त

कार्यकारिणी समितीची पुनर्रचना

प्रधान
श्री. जे. आर. डी. 'सत्यार्थी'जी

उप-प्रधान
श्री. देवराज बजाजजी

महासचिव
श्री. व्ही. डी. नागपालजी

सचिव
श्री. मंगलसेनजी व
श्री. सी. एल. गुलाटीजी

दोन नवीन सदस्य नियुक्त :

श्री. हरबन्सलाल अरोराजी
(दूर देशात प्रचार-प्रबंध व सेवादल विभाग प्रभारी)

श्री. आर. एस. कपूरजी
(शिक्षण विभाग, प्रभारी)

दिल्ली, १८ एप्रिल २००९ : संत निरंकारी मंडळाच्या सर्वसाधारण सभेच्या (जनरल बॉडी) दोन दिवसीय विशेष अधिवेशनाच्या समारोप सत्रात सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी कार्यकारिणी समितीची (एक्झेक्युटीव्ह बॉडी) पुनर्रचना करताना विभागात व्यापक फेरबदल, सेवादल प्रबंधकीय व्यवस्थेत बदल, प्रबंध व्यवस्थेच्या दृष्टीने देशाची पाच क्षेत्रात विभागणी आणि क्षेत्रीय स्तरावर विशेष तज्ज्ञांची कमिटी स्थापन करणे तसेच '**संत निरंकारी चॅरिटेबल सोसायटी**' स्थापित केल्याची घोषणा केली.

सद्गुरूदेवांनी संत निरंकारी मंडळाच्या विद्यमान कार्यकारिणी समितीच्या (एक्झेक्युटीव्ह बॉडी) सदस्यांनी मिशनसाठी केलेल्या समर्पित सेवांची प्रशंसा करून त्यांची निष्ठा, परिश्रम व उत्साह ध्यानात घेऊन तसेच कार्यकारिणी समितीच्या वरिष्ठ सदस्यांचा दीर्घकाळ अनुभव व योग्यता विशेष रूपाने भविष्यात लाभदायक व्हावी या उद्देशाने ऐतिहासिक निर्णय घेताना संत निरंकारी मंडळाच्या प्रबंधकीय व्यवस्थेला नवे स्वरूप प्रदान केले आणि एका उच्च स्तरीय '**केंद्रीय सल्लागार बोर्डा**'ची स्थापना केली. हे बोर्ड संत निरंकारी मंडळाचे नीती निर्धारक बोर्ड असेल, जे मंडळाच्या वार्षिक बजेट प्रस्तावाला मंजूरी देण्याचे कार्य करील.

सद्गुरू बाबाजींनी केंद्रीय सल्लागार बोर्डाचे चेअरमन म्हणून **श्री. गोविंदसिंहजी** आणि व्हाईस-चेअरमन म्हणून **श्री. खेमराज चड्ढाजी** यांची नियुक्ती केली. श्री. अमरिकसिंहजी, श्री. गुरबख्शसिंहजी 'राजकवी', श्री. एस. एल. अरोराजी, श्री. जे. डी. शर्माजी, श्री. पी. एस. आहलूवालीयाजी, श्री. मानसिंहजी 'मान' व श्री. राधेश्यामजी यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला.

सद्गुरू बाबाजींनी घोषित केले की, नवीन व्यवस्थेनुसार आता साधारण सभेत (जनरल बॉडीत) केंद्रीय सल्लागार बोर्ड, कार्यकारिणी समितीचे सदस्य, सेवादलचे केंद्रीय पदाधिकारी, झोनल इन्चार्ज, क्षेत्रीय संचालक तसेच प्रमुख हे सदस्य असतील. जनरल बॉडीतून कार्यकारिणी समितीसाठी ११ सदस्यांची निवड करण्यात येईल आणि आवश्यकतेनुसार इतर सदस्य निवडण्यात येतील.

याबरोबरच कार्यकारिणी समितीची पुनर्रचना करण्यात येऊन विभागात व्यापक फेरबदल करण्यात आले. पुनर्रचित कार्यकारिणी समितीचे प्रधान म्हणून **श्री. जे. आर. डी. 'सत्यार्थी'जी** राहतील. ते कार्यकारिणी समितीच्या सदस्यांमध्ये समन्वयाचे कार्य पार पाडतील. उप-प्रधान म्हणून **श्री. देवराज बजाजजी** असतील. ते दक्षिण भारत, ओरिसा, पं. बंगाल, सिक्कीम, पूर्वोत्तर राज्यांसह अंदमान व निकोबार द्वीपसमूह तसेच गोवा ब्रॅन्चचे प्रशासन प्रभारी म्हणून पूर्वीप्रमाणेच जबाबदारी सांभाळतील.

नव-नियुक्त महासचिव (जनरल सेक्रेटरी) **श्री. व्ही. डी. नागपालजी** भवन निर्माण विभागाचे प्रभारी राहतील. सोबत जम्मू-काश्मिर, केंद्र शासित क्षेत्र चंदिगड, हिमाचल प्रदेश, हरियाणा, पंजाब, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गुजरात, महाराष्ट्र, बिहार, झारखंड, उत्तरप्रदेश व उत्तराखंडच्या ब्रॅन्च प्रशासनाची जबाबदारी सांभाळतील.

सचिव **श्री. मंगलसेनजी** दिल्ली व ग्रेटर दिल्ली ब्रॅन्च प्रशासनाच्या जबाबदारीसह यापुढे ट्रान्सपोर्ट आणि लंगरचे प्रभारी म्हणून राहतील. संत निरंकारी मंडळाचे नवनियुक्त सचिव **श्री. सी. एल. गुलाटीजी** नवीन पदभारासह पूर्वीप्रमाणेच पत्रिका विभागाचे प्रभारी म्हणून कार्यभार पाहतील. नवीन प्रबंधकीय रचनेनुसार **श्री. देसराज सिक्काजी** कोषाध्यक्ष आणि वित्त प्रभारी म्हणून राहतील.

सेवानिवृत्त ब्रिगेडीयर **श्री. शमशेरसिंहजी** वैद्यकीय, आरोग्य व समाज कल्याण विभागाचे प्रभारी म्हणून पूर्वीप्रमाणेच जबाबदारी पार पाडतील. सेवानिवृत्त ब्रिगेडीयर **श्री. पी. एस. चिमाजी** वैद्यकीय, आरोग्य व समाज कल्याण विभागाचे अतिरिक्त प्रभारी तसेच पूर्वीप्रमाणेच सुरक्षा विभागाची जबाबादीर पार पाडतील.

कार्यकारिणी समितीमध्ये नियुक्त करण्यात आलेले नवीन सदस्य **श्री. हरबन्सलाल अरोराजी** दूर-देशातील प्रबंध व्यवस्था आणि सेवादल विभागाचे प्रभारी म्हणून राहतील.

श्री. मदनसिंह अलघजी लेखा-जोखा, मानव संसाधन व सामान्य प्रशासन विभाग (HRD)चे प्रभारी असतील आणि **श्री. एस. एल. खुराणाजी** लेखा-जोखा विभागाचे अतिरिक्त प्रभारी असतील.

श्रीमती **जोगिंदर कौरजी** प्रचार विभागाच्या प्रभारी म्हणून राहतील. **श्री. अशोक कुमारजी** स्टोअर्स विभागाबरोबर यापुढे भूमी खरेदीची जबाबदारी सांभाळतील, तर **श्री. बृजमोहन सेठीजी** भूमी खरेदीसाठी श्री. अशोककुमारजींचे सहयोगी असतील. **श्री. रजनीशकुमार झंबजी** पूर्वीप्रमाणेच निरंकारी स्टुडिओ, कॅन्टीन व सरोवर कॉम्प्लेक्सचे प्रभारी म्हणून राहतील.

श्री. कृपासागरजी प्रकाशन (उत्पादन आणि विक्री सोडून - Except Production and Sale), प्रेस-पब्लिसिटी, संगणक व इंटरनेट विभागाचे प्रभारी राहतील, तर **श्रीमती राज वासदेवसिंहजी** यापुढे प्रकाशन (उत्पादन आणि विक्री - Production and Sale) प्रभारी म्हणून राहतील.

कार्यकारिणी समितीमधील नव-नियुक्त सदस्य **श्री. आर. एस. कपूरजी** शैक्षणिक विभागाचे (सरकारी साहाय्यता प्राप्त शाळा-कॉलेज आणि पब्लिक स्कूल्स्) प्रभारी असतील.

सेवादल प्रबंधकीय व्यवस्थेत बदल :

सद्गुरू बाबाजींनी सेवादल प्रबंधकीय व्यवस्थेत बदल केला आहे. यापुढे नव्या स्वरूपात एक मुख्य संचालक आणि चार उप-मुख्य संचालक असतील. मुख्य संचालक म्हणून **श्री. जे. एस. खुराणाजी**, उप-मुख्य संचालक (प्रशासन) **श्री. एच. एस. कोहलीजी**, उप-मुख्य संचालक (क्षेत्र) **श्री. ओ. पी. निरंकारीजी**, उप-मुख्य संचालक (प्रशिक्षण) **श्री. वासदेवसिंहजी** तसेच उप-मुख्य संचालक (मुख्यालय) **श्री. तेजिंदरसिंहजी** पदभार सांभाळतील.

वि. सू.: उपरोक्त बदल (परिवर्तन) १ मे २००९ पासून लागू होतील. कार्यकारिणी समितीच्या सदस्यांचा कार्यकाळ ३ वर्षे राहील.

शिक्षक प्रतिनिधी (दिल्ली) यांजकडून - सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज म्हणाले की, श्री. डी. आर. शाहजीनी पारिवारिक सामाजिक आणि देशाप्रति आपल्या कर्तव्याचं पालन करुन भक्तिभाव प्रबळ ठेवला आणि सेवेतही अनुकरणीय योगदान दिलं. पश्चिम बिहारच्या अंबिका विहार येथे 'शाह इंटरनॅशनल सेकंडरी स्कूलच्या' विशाल मैदानात ब्रह्मलिन पद्मश्री डी. आर. शाह यांच्या श्रद्धांजली समारोहात ते बोलत होते.

सद्गुरुदेव पुढे म्हणाले की, भक्तिभाव आणि सेवेच्या उत्साहाने परिपूर्ण अशा महापुरुषाच्या जीवनाला आज श्रद्धासुमनं अर्पित केली जात आहेत. युगपुरुष बाबा अवतारसिंहजींकडून ब्रह्मज्ञान प्राप्त करुन गुरुवचनाच्याप्रति नतमस्तक होऊन त्यांनी सामाजिक सेवेतही स्वतःला समर्पित करुन घेतलं. कोणत्याही रुपात असो, मानवतेची सेवा घडावी हीच त्यांची इच्छा होती. संत निरंकारी मिशनशी जोडल्यानंतर त्यांच्या या दृष्टिकोनाला व्यापकता मिळाली. कर्माच्या क्षेत्रात राहूनच वास्तविकरुपाने त्यांनी धर्माचं पालन केलं.

बाबाजी म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचं महत्वपूर्ण योगदान होतं. याच कारणास्तव त्यांना मिशनच्या शाळांच्या प्रबंध व्यवस्थेची जबाबदारी दिली गेली होती. त्यांना ज्या ज्या जबाबदाऱ्या दिल्या गेल्या त्या त्यांनी यथोचित पार पाडल्या. शारीरिक अस्वस्थता असून सुद्धा त्यांनी सेवेचं ध्यान आणि उत्साहात कमतरता येऊ दिली नाही.

सद्गुरु म्हणाले की, परिवाराच्या सदस्यांनी पारिवारिक कर्तव्याचं पालन करत आध्यात्मिक क्षेत्रातही सक्रिय रहावं. जीवनाच्या अंतिम श्वासापर्यंत त्यांनी आपला विश्वास दृढ ठेवला. ते निरंतर सेवाकार्यातच असत. सामाजिक सेवेतील त्यांच्या अनमोल योगदानाबद्दल त्यांना **पद्मश्री** हा किताब दिला गेला.

जीवन तर सगळेच जगत आहेत, परंतु सत्यावर आधारित जीवनच महत्वपूर्ण मानलं जातं. परमात्म्याशी नातं जोडून मानवता आणि प्रेमभावाने युक्त झालेल्या जीवनालाच जीवन म्हटलं जातं. जो

(पुढील मजकूर पान क्र. २१ वर)

परस्पर सद्भावनेचे वातावरण बनवा आणि मिशनप्रति उत्साहाने कार्य करा.

विशेष जनरल बॉडी मिटींगमध्ये प्रचारक व प्रबंधकांना सद्गुरू बाबाजींचे आवाहन

दिल्ली, १७ एप्रिल २००९ :- बुराडी रोड ग्राऊंड नं. ८ येथे संत निरंकारी मंडळाच्या सर्वसाधारण सभेचे (जनरल बॉडी) दोन दिवसीय विशेष अधिवेशन पार पडले. या प्रसंगी सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी आवाहन केले की, संत निरंकारी मिशनच्या प्रचार-प्रसारात सुव्यवस्थितपणा आणण्यासाठी चांगल्या तऱ्हेने कार्य व्हायला पाहिजे आणि मिशनच्या प्रति उत्साह दाखवून सकारात्मक दिशेने पावलं उचलण्यासाठी आपण सर्वांनी योगदान दिले पाहिजे.

मिशनच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा उल्लेख करून सद्गुरू बाबाजी म्हणाले की, **बाबा बूटासिंहजी** यांनी सत्य-ज्ञानाच्या या अभियानाचा आरंभ केला आणि मग युगपुरुष **बाबा अवतारसिंहजींनी** गुरूच्या प्रत्येक वचनाला सत्य मानून ब्रह्मज्ञानाच्या प्रचाराचा विडा उचलला. त्या काळात लोक सत्याचा आवाज ऐकण्यास तयार नव्हते. अशा विपरीत परिस्थितीत अनेक अडथळ्यांची पर्वा न करता प्रचाराच्या अभियानास त्यांनी मजबूती दिली. देशाच्या फाळणीपूर्वी आणि फाळणी नंतरही हे सत्यज्ञान ठिकठिकाणी पोचविण्याचे कार्य केले. अशा तऱ्हेने हळू-हळू अभियानाचा हा तांडा वेगाने वाढू लागला.

युगपुरुष बाबा अवतारसिंहजी यांच्या नंतर **बाबा गुरबचनसिंहजी** यांनी १७ वर्षात देशाच्या निरनिराळ्या भागातच नव्हे तर देशाची सीमा ओलांडून सत्याचा संदेश पोचवून मिशनला विश्व-व्यापी स्वरूप प्रदान केले. त्यांनी संत निरंकारी मंडळाच्या प्रबंधकीय व्यवस्थेलाही सुदृढ केले. सन १९६५ आणि १९७३ साली झालेल्या 'मसूरी कॉन्फरन्स' मध्ये ऐतिहासिक निर्णय घेण्यात आल्याने प्रचार अभियानाला सुव्यवस्थितपणा आला. त्यांनतर १९७५ मध्ये लुधियाना कॉन्फरन्स झाली. १९७९ साली अखिल भारतीय कार्यकारी समिती स्थापित करण्यात आली.

त्यानंतर विशेष बैठकीच्या कार्यवाहीचे संचालन करताना सचिव श्री. खेमराज चड्ढाजींनी श्रद्धांजली ठराव सादर केला. त्यात वार्षिक संत समागमनंतर आपली जीवनयात्रा संपन्न करुन ब्रह्मलीन झालेले, जे जनरल बॉडीचे सदस्य होते त्यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. दोन दिवस चाललेल्या या बैठकीच्या तीन सत्रात देशाच्या अनेक ठिकाणांहून आलेल्या महात्म्यांनी काही उपयुक्त ठराव (सूचना) सादर केले.

दोन दिवसीय बैठकीच्या दुसऱ्या दिवशीच्या समारोप सत्रात आशीर्वाद प्रदान करताना निरंकारी राजमाता कुलवंत कौरजी म्हणाल्या की, **बाबा बूटासिंहजी, बाबा अवतारसिंहजी, बाबा गुरबचनसिंहजीपासून** आज **बाबा हरदेवसिंहजींच्या** चरणाशी बसून भक्तीचा आनंद घेत आहे. कधीही सासरा, पती किंवा पुत्राच्या नव्हे तर सदैव सद्गुरूच्या दर्जालाच महत्त्व दिले आहे. सद्गुरूचं शरीर बदलतं, ज्ञान बदलत नाही. सद्गुरूची जी काही वचनं येतील, ती वचनं सत्य मानत जावी हीच प्रार्थना आहे. सद्गुरूच्या वचनाला मानून जेव्हा आपण चालतो, तेव्हा जीवनाचा प्रवास सुखमय होतो. जीवनात भक्तीचा वास असावा. जीवनभर भक्तीपथावर दृढ विश्वासाने वाटचाल करावी आणि आनंदाचे भागीदार बनावे.

समारोप सत्रात देशभरातून आलेल्या प्रचारक आणि प्रबंधकांना आवाहन करताना **सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज** म्हणाले की, परस्पर सद्भावनेचं वातावरण बनवावं आणि सकारात्मक विचारांच्या आधारावर मिशनच्या प्रगतीसाठी कार्य करावे. प्रत्येक ठिकाणी स्वच्छ आणि निर्मळ वातावरण बनविण्याच्या दिशेने योगदान द्यावे. सर्वांनी आपापली जबाबदारी चांगल्या तऱ्हेने पार पाडावी.

सद्गुरू बाबाजी पुढे म्हणाले की, आज मिशनचा विस्तार झाला आहे. अगोदर असे काही प्रांत होते जेथे मिशनचा आवाज पोहचला नव्हता, परंतु आता त्या प्रांतात सत्याचा आवाज पोहचला आहे, आज तिथे मिशनचे अस्तित्व आहे. वास्तविक पाहता साधारण महापुरुषांनीच प्रचाराचा पाया रचला आहे. दूर-दूरवरच्या मागास क्षेत्रात, डोंगराळ आणि दुर्गम भागात, जेथे विविध संस्कृती किंवा भाषेचे लोक राहतात, तेथेही सत्याचा संदेश पोहचला आहे. परंतु अजूनही अशी काही ठिकाणं आहेत, जेथे सत्याचा संदेश पोहचला नाही. संसारातील प्रत्येक मानव अज्ञानाच्या अंधारातून प्रकाशात यावा हाच मिशनचा उद्देश आहे. विश्वातील इतर देशातही हा प्रचार पसरत आहे, परंतु तेथेही आणखी काही करण्याची आवश्यकता आहे.

सद्गुरू बाबाजी पुढे म्हणाले की, सर्वजण स्वैच्छिक रूपात प्रबंध आणि प्रचाराची सेवा करत आहेत. कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडून या अभियानातही योगदान देत आहेत; निश्चितपणे ही गोष्ट प्रशंसनीय आहे. कार्यात सुव्यवस्थितपणा आणण्यासाठी जी जी पावलं उचलली गेली, त्यात यश प्राप्त झालं. हा उत्साह टिकून राहिला पाहिजे. जेथे उत्साह असतो तेथे सफलता असते. प्रबंधाच्या दृष्टीने काही नावं जोडली आहेत, परंतु हुद्दा किंवा पद दिलेले नाही, तर सेवेची संधी दिली आहे. देश असो किंवा विश्वातील एखादा अन्य देश, मिशनचे जे सिद्धांत आहेत; ते प्रत्येक ठिकाणी लागू होतात.

(पान २७ वरुन)

पद्मश्री डी. आर. शाह

मानवमात्राशी प्रेम करतो त्यालाच प्रभू प्रेमी म्हटलं जातं.

सद्गुरु बाबाजी म्हणाले की, सर्वांच्या विषयी हिताची भावना ठेवणाराच समदृष्टीचा भाव जोपासू शकतो. जीवनाचं मनोरथ पूर्ण करणाऱ्यांनाच भाग्यवान म्हटलं जातं. जसं शहाजींनी केलं. माणूस शरीराचा विचार करतो, पण आत्म्याचा नाही. सत्याचा बोध झाल्यानंतरच आत्म्याचं कल्याण होतं.

श्रद्धांजली समारोहात समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. ऑईल मिल्स असोशिएशन, राजस्थान व्हेजिटेबल ऑईल सप्लायर्स असोशिएशन, पंजाब मैत्री संघ आणि सनातन धर्म सभा, भगवान दास नगर (दिल्ली) यांनी लिखितरुपाने श्रद्धांजली पाठवून आपली श्रद्धांजली व्यक्त केली.

संत निरंकारी मंडळाचे प्रधान श्री. जे. आर. डी. सत्यार्थीजी, सचिव श्री. खेमराज चड्ढाजी, श्री. अमरिक सिंहजी, श्री. इंद्रजीत शर्माजी, श्री. कुलदीप सिंहजी, श्री. अमरनाथ 'नाथ'जी, गायक स्वर्ण सिंहजी, विनोदजी आणि अरुण स्वामी यांनीही आपली श्रद्धा सुमनं अर्पित केली. शेवटी शाहजींचे सुपुत्र श्री. सुरिंदर शाहजींनी आलेल्या सर्व सज्जनांचे आभार मानले आणि म्हणाले की, आपण सर्वांनी त्यांच्या शिकवणीनुसार चालणं हीच त्यांच्यासाठी खरी श्रद्धांजली होईल. कार्यक्रमाचं संचालन श्री. राकेश मुटरेजा यांनी केलं.

पद्मश्री डी. आर. शाहजी संत निरंकारी मंडळाचे उपप्रधान होते. ते १४ मार्च २००९ ला ब्रह्मलीन झाले. त्यांची अंत्ययात्रा त्याच दिवशी संध्याकाळी ४ वा. पंजाबी बाग (पश्चिम) निवासस्थानावरुन आरंभ होऊन संध्या. ५ वा. पंजाबी बाग शवदाहगृहात त्यांच्यावर अंतिम संस्कार केले गेले.

अंतिम संस्काराच्या वेळी संत निरंकारी मंडळ आणि संत निरंकारी सेवादलचे केंद्रिय पदाधिकारी तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

विशेष जनरल बॉडी मिटींगमध्ये सद्गुरू बाबाजींद्वारा घेतलेले मुख्य निर्णय

प्रबंधकीय व्यवस्थेत सुंदरपणा :

प्रबंधकीय व्यवस्थेत सुंदरता आणण्यासाठी देशाची पाच क्षेत्रात विभागणी केली जाईल. त्या क्षेत्रांमध्ये प्रबंध व्यवस्था, लेखा-जोखा, भवन निर्माण संबंधी विशेष तज्ज्ञांची टीम बनविली जाईल.

ज्ञान-प्रदानाची परवानगी :

ज्ञान प्रदान करण्याची परवानगी यापुढे जेथे आवश्यकता असेल त्याच क्षेत्रांमध्ये दिली जाईल. ज्ञान देण्याची परवानगी देण्यापूर्वी अशा ज्ञानप्रचारक महात्म्यांना प्रचारक प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षित केले जाईल. नवीन व्यवस्था लागू होईपर्यंत केंद्रीय सल्लागार बोर्ड, कार्यकारिणी समितीचे सदस्य (EC Members), केंद्रीय सेवादल पदाधिकारी तसेच झोनल इन्चार्ज यांनाच ज्ञान देण्याची परवानगी असेल.

बिल्डींग फंड :

मिशनचे वाढणारे कार्य पाहून बिल्डींग फंड, जो यापूर्वी प्रत्येक दर डोयी महिन्याला (प्रत्येक सदस्यापोटी) ५ रुपये होता; तो आता १० रुपये करण्यात आला आहे. ही व्यवस्था त्वरित लागू करण्यात आली आहे.

अवतार बाणी :

संत निरंकारी मिशनच्या दृष्टिकोनातून प्रत्यक्ष गुरूचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे, परंतु 'अवतार बाणीचे' गांभीर्य ध्यानात ठेवायला हवे. हा ग्रंथ दिव्य वचनांचा संग्रह आहे, म्हणून योग्य पद्धतीने तो हाताळणे तसेच त्याचे वाचन श्रद्धा आणि सन्मानपूर्वक करायला हवे.

नशाबंदी :

मिशनच्या प्रत्येक सदस्यासाठी ही नशाबंदी लागू आहे. जर तो सेवादलचा सदस्य असेल किंवा प्रबंधक व प्रचारक असेल, तर सर्वांनी या गोष्टीचे पालन करायला पाहिजे. जर कोणी ही सवय (व्यसन) सोडण्यास असमर्थ असेल, तर त्याने स्वेच्छेने आपल्या सेवेपासून मुक्त व्हावे.

वाचनाप्रति आवड :

वाचन करण्याची आवड वाढवावी आणि मिशनचे साहित्य तसेच पत्र-पत्रिकांच्या प्रसारासाठी योगदान द्यावे. प्रत्येक ब्रॅन्चमध्ये साहित्य व पत्र-पत्रिका (स्टॉल रूपात) प्रदर्शित कराव्यात जेणेकरून जी पुस्तकं प्रकाशित होतात त्याची साधसंगतला माहिती होईल. प्रचारकांची ही जबाबादारी आहे की, सर्वप्रथम त्यांनी मिशनचे साहित्य-पुस्तकं, पत्र-पत्रिका यांचे वाचन करावे. त्यांनी इतर धर्म, ग्रंथांचेही वाचन करावे, जेणेकरून मिशनच्या सिद्धांतानुसार उपयोगी सामग्री प्राप्त होईल आणि अन्य धार्मिक आस्था बाळगणाऱ्यांना त्यांच्या धार्मिक आस्थे अनुरूप ज्ञान देणे शक्य होईल.

वेळेचं बंधन :

सत्संग समारोहातील समयाच्या बंधनाबाबत फारच सावध राहण्याची गरज आहे. सत्संगाची जी वेळ (समय) निश्चित केली आहे, त्या वेळेनुसारच सत्संगाची सुरूवात आणि समारोप व्हायला पाहिजे. गणमान्य सज्जनांना सत्संगाच्या अंतिम सत्रातच आमंत्रित करावे.

रस्ता अडविण्याला प्रतिबंध घालावा :

सद्गुरू बाबाजींच्या कल्याणयात्रेदरम्यान ज्या रस्त्याने कल्याणयात्रींचा तांडा जात असतो, अशा ठिकाणी कोणताही नियोजित कार्यक्रम नसतानांही थोड्या-थोड्या अंतराने साधसंगत एकत्रित होऊन नमस्कार

आणि आशीर्वादासाठी कल्याणयात्रींना अडविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे नियोजित मुख्य सत्संग कार्यक्रमाला पोहचण्यास विलंब लागतो. याबाबतीत समस्त झोनल इन्चार्ज, प्रमुख व मुखी यांनी ध्यान द्यावे.

सत्संगात नृत्य (नाच) करणे टाळावे :

प्रचाराच्या दृष्टीने आयोजित खुले (जनरल) सत्संग कार्यक्रम, साप्ताहिक सत्संग तसेच प्रादेशिक समागम प्रसंगी प्रफुल्लित करणारी गाणी गाईली जातात. अशावेळी टाळया वाजविणे वर्जित नाही, परंतु नाचणे वर्जित आहे, ज्यामुळे सत्संगाचे पावित्र्य कायम राहात नाही. त्याचवेळी समाजातील अन्य लोकही तेथे उपस्थित असतात, त्यांच्यावर विपरीत प्रभाव पडतो. म्हणून अशा सत्संग कार्यक्रमात नाचणे टाळावे. ज्यावेळी सद्गुरु बाबाजींचे आगमन होईल किंवा त्यांना निरोप देण्याचा प्रसंग असेल अशावेळी भवनच्या प्रांगणात नाचून - गाऊन आपण आपला आनंद व्यक्त करु शकता.

परस्पर ताळमेळ :

प्रचारक आणि प्रबंधक यांच्यात परस्पर ताळमेळ असायला पाहिजे. प्रचार आणि प्रबंध हे एकमेकांशी जोडलेले पैलू आहेत. प्रत्येकाने आपल्या जबाबदारीप्रति मर्यादित राहावे. झोन स्तरावर ज्या मर्यादा आहेत, त्या अशा असू नयेत की एखादा कोणी दुसऱ्या झोनमध्ये जाऊच शकत नाहीत. आवश्यकतेनुसार एका झोनमधून दुसऱ्या झोनमध्ये मर्यादा अंतर्गत जायला पाहिजे. जर आपल्या लक्ष्याकडे गांभिर्यपूर्वक पाहिल्यास आपण आपापली जबाबदारी सुंदर पद्धतीने पार पाडू शकतो.

आध्यात्मिक पैलू मजबूत रहावा :

आध्यात्मिक पैलू मजबूत करणे हे मिशनचे मुख्य ध्येय आहे. आत्म्याला मुक्ती देणे यापेक्षा मोठी सेवा असूच शकत नाही, अर्थात् याबरोबरच मानवमात्राच्या सेवेतही मिशन महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. अशा अनेक संस्था आहेत, ज्यांनी समाजसेवेचा अंगीकार केला आहे, परंतु मिशन आध्यात्मिक जागृती सोबत समाजसेवेसाठीही योगदान देत आहे.

साधेपणाने विवाह :

हुंड्याच्या थाटमाटापासून दूर रहावे. साधेपणाचे आदर्शमय विवाह करणे सामाजिक सुधारणेच्या दिशेने एक अनुकरणीय पाऊल आहे. आंतरजातीय विवाह करण्यामागचा उद्देश हाच आहे की, सामाजिक अनिष्ट रूढींपासून लोकांना बाहेर काढणे. विद्युतरोषणाईसाठी नाहक खर्च करण्यापेक्षा दिवसा विवाह व्हावेत. विवाहप्रसंगी शाकाहारी भोजनाचेच आयोजन करावे.

जाती-पातीच्या पलीकडे जावे :

ब्रह्मज्ञान प्राप्ती समयी पाच प्रण स्वीकारले जातात. जाती-पातीच्या आधारावर कोणाचीही घृणा करू नये असे दुसऱ्या प्रणात सांगितले आहे. जात-पात मानू नये असे अवतार बाणीत प्रतिपादन केले आहे. असे असूनही जर आपण जाती-पातीचे प्रश्न उभे करत असू, तर ही गोष्ट योग्य नाही. कोणालाही जाती-पातीच्या आधारावर कोणतीही जबाबदारी दिली जात नाही. जर ज्ञान आपलेसे (स्वीकारले) केले असेल तर अशी समस्या उभी राहू शकतच नाही.

बौद्धिक वर्गात प्रचार :

मिशनच्या सिद्धांतानुसार बौद्धिक (बुद्धिवंत) वर्गाला जोडण्यासाठी सेमिनार (चर्चासत्र) इत्यादीचा आधार घेतला जातो. कारण असा वर्ग सत्संग समारोहात येण्यास कां कूं करतो. आधुनिक तंत्रज्ञान, संगणक तसेच इंटरनेटच्या माध्यमातून अशा वर्गाला आपण प्रभावशाली पद्धतीने मिशनच्या जवळ आणू शकतो.

भक्तीमध्ये केवळ
भोळ्या भावनेला श्रेष्ठत्व

सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी दि. 29 मार्च 2009 रोजी बुराडी रोड, ग्राऊंड नं. 8 येथील रविवारच्या सत्संग समारोहात श्रद्धाळू भक्तांना संबोधित करताना 'संपूर्ण अवतार बाणी - पद क्र. २५० 'वर आपली सारगर्भित दिव्य विचारधारा प्रगट केली. या विचारधारेचे शब्दांकन ***सविता चौधरी*** *(दिल्ली) यांनी केले आहे.*

कर्मकांड आचरूनी मानव
बंधनात बंदी होतो
कोळीयापरी जाळे विणूनी
जीव आपुला घालवितो
भले बुरे हे कर्म मानवा बंधन
लोह-सोन्याचे
ज्ञानावाचून कर्म हे सारे
तिमिरा वाहून नेण्याचे
कर्म एकची उत्तम आहे
बाकी मिथ्या असे कहाणी
अवतार प्रभू ज्ञानाविण
जैसे घुसळावे रविने पाणी

(अवतार बाणी २५०)

संसारात चलाखी, चतुराई, धूर्तपणा यांचा वापर केला जातो, परंतु भक्तिमार्गात मात्र निष्कामता, निर्लेपता व भोळी भावनाच असते. ज्याप्रमाणे अभिमान, घृणा किंवा कोणत्याही विपरीत भावनेला कोणतंही स्थान नसतं, त्याप्रमाणेच चलाखी, चतुराई व धूर्तपणाला कोणतंही स्थान नसतं. संसारात भ्रमण करताना चेतनतेची (सावधानता) गरज असते. संसारात राहण्यासाठी चलाखी आणि चतुराईची जरूरी असते, असे नेहमीच म्हटले जाते, परंतु चलाखी व चतुराईचा अर्थ लबाडी असा होत नाही, तर ती एक चेतनता असते. सावधानी आणि अक्कलहुशारीने संसारात भ्रमण करायचे आहे. मात्र येथे त्या चतुराईचा उल्लेख केला जात आहे की, माणूस अशा चलाखी आणि चतुराईचा वापर करतो; ज्यात कपट आणि लबाडी ठासून भरलेली असते, पण शेवटी त्या जाळ्यात तो स्वत:च गुरफटला जातो.

येथे बाबा अरतारसिंहजी जो उल्लेख करत आहेत की, अशाप्रकारे आपण भोळ्या भावनेने अक्कलहुशारीसह हा जीवनाचा प्रवास पार पाडायचा आहे. भोळेपणाचा अर्थ असा होतो की; त्याने आपला भाव चतुराईवाला बनवला नाही आणि आपल्या स्वभावात चतुराई येऊ दिली नाही. हाच विवेक आहे, हीच समज आहे की तो एक भोळा भाविक बनला आहे. **'भोले भाव मिले रघुराया'**, तसेच **'साधु भुखा भाव का, धन का भूखा नाहीं'** अशा प्रकारची वचनं या संदर्भात म्हटली गेली आहेत; नाहीतर संसारात आपल्याला पाहायला मिळतच की, पावलोपावली चतुराई आणि चलाखीचा कशाप्रकारे उपयोग केला जातो. संसारात वावरताना कित्येकदा आपली भाषादेखील तशीच बनते.

एक टांगेवाला आपल्या घोड्याला संबोधित करताना प्रेमाने भरलेल्या शब्दांचा वापर करतो. तो अशा शब्दांचा वापर करत नाही, ज्याला आपण शिवीगाळ म्हणतो. कोणीतरी त्याला विचारले की, 'तू काय करत आहेस ? हा घोडा आहे, याला जरी तू शिव्या दिल्यास तरी काय फरक पडणार आहे ? तो पुढे धावत राहावा म्हणून शिवी दिलीस, तर फारसं

काही अडणार नाही.' त्यावर टांगेवाला म्हणाला, ''घोड्याला फरक पडो-न-पडो, परंतु माझी भाषा मात्र शिवराळ होऊ नये याचीच मला भीती वाटते.'' अशाप्रकारे आपण संसारात वावरताना आपल्यावर असा परिणाम होतो की, आपली प्रवृत्ती आणि आपली भाषा देखील तशीच बनते आणि मग त्याचा वापरही आपण गुरमुखांबरोबर करतो. त्याचे परिणाम आणि नुकसान किती होते हे कळतही नाही.

• कोळी नावाचा किडा आपण पाहिला आहे. तो अतिशय सुंदरतेने जाळे विणतो; परंतु त्यातून बाहेर येण्याचा रस्ता मात्र त्यालाच मिळत नाही. तो विचार करतो की, लहान-सहान किडे या जाळ्यात फसतील आणि माझा आहार बनतील. तर काही किडे त्या जाळ्यात फसतातही आणि त्यांच्याप्रमाणे तोही स्वत: त्या जाळ्यात गुरफटला जातो.

• चांगली कर्म सोन्याची बेडी तेव्हाच बनतील जेव्हा ती चांगली कर्म करून आपण अभिमान करू लागतो. म्हणजेच तेथे कर्ताभाव आला आणि मग आपण बेडीत अडकलो. जेथे आपण निराकार-दातार मालकाला समर्पित व्हायला पाहिजे होते, तेथे आपण अभिमान करू लागलो. त्यामुळे तेही आपल्यासाठी बंधनाचं एक कारण बनलं. ते बंधन असं की, मी केले आहे आणि मी करणार आहे. जे या दातार प्रभूला समर्पित होतात, ते खरोखरच अशा बेडीपासून स्वत:ची सुटका करून घेतात. प्रत्येक प्रकारच्या बेडीतून ते आपली सुटका करून घेतात. पाहिल्यास असं वाटतं की कदाचित ते एखाद्या बंधनात आहेत, परंतु खरं तर ते बंधन नसतंच. कर्तव्य पार पाडली जात आहेत, कर्तव्यांचं पालन केलं जात आहे; परंतु पाहणाऱ्याला भ्रम होतो की, हे बंधनात आहेत.

कवितेची एक ओळ आठवतेय की, **'कई पिंजरे के भीतर भी आज़ाद रहे और कई पिंजरे के बाहर भी कैद में रहे।'** अशाप्रकारे आपल्या दृष्टीस काही वेगळंच पाहायला मिळतं, परंतु वास्तविकता मात्र काही वेगळीत असते.

सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की भक्त, महापुरुष, संतजन आम्हाला कर्म करण्यापासून पलायन न करण्याचा संदेश देत आले आहेत. अर्थात् असं नाही की दगड बनून आपण एका किनाऱ्यावर पडून राहावं किंवा ओसाड जागी तंबू बांधून वास्तव्य करावं. कर्म तर करायचंच आहे, कर्म क्षेत्रातच राहायचं आहे. लोखंड किंवा सोन्याच्या बेडीपासून पलीकडे जाणे याचा अर्थ असा होत नाही की एखाद्या जडतेचं रूप बनावं, जडावस्था धारण करावी. नाही. चेतन आहे, जिवंत आहे आणि आपण नाना प्रकारची आपली कर्तव्ये पार पाडायची आहेत, परंतु या निराकार दातारला समर्पित व्हायचे आहे. आपल्या मनातून एक कर्ताभाव काढून टाकायचा आहे.

• कर्म कसं आहे? तर ज्ञानाच्या उजेडाशिवाय अंधाराचे ओझे वाहून नेण्यासारखे. अर्थात् ओझे वाहण्याचा अर्थ होतो, घाण्याला जुंपलेल्या बैलासारखा; जो सारखा ओझं घेऊन गोल-गोल फिरत असतो. कर्म तर करत आहे, फिरण्याची क्रिया तर होत आहे, परंतु त्याचे कुठेही निश्चित पोहचणे नाही. एका बंधनात एकाच ठिकाणी सभोवार फिरतच राहणे, बस्स. डोळ्यावर पट्टी बांधून कर्म करायचे म्हणून करत आहे ते अशा पद्धतीने की त्याला वाटत असावे मी फार दूर जात आहे, परंतु कोठेही निश्चित जागी तो पोहचत नाही.

तीन मित्र रात्रीच्या वेळी होडीत बसले आणि अंधाऱ्या रात्री होडी चालविण्यासाठी वल्ही मारू लागले. रात्रभर वल्ही मारत राहिले. सूर्यप्रकाशाची किरणं धरतीवर पडू लागली. त्यांना वाटलं की, आपण रात्रभर वल्ही मारली आणि जवळपास असलेला किनारा आता दिसत आहे. आता अगदी किनाऱ्याजवळ आल्यासारखं वाटलं. तेव्हा

ध्यानपूर्वक पाहून एकजण म्हणाला, 'हा तर आपल्याच गावचा किनारा आहे आणि येथूनच आपण निघालो होतो! तेव्हा दुसरा म्हणाला, 'मूर्ख आहेस काय? रात्रभर आपण वल्ही मारली, होडी चालवली. रात्रभर होडी चालवण्याचे कर्म केले, मेहनत केली आणि तरीही तू म्हणतोस की, आपण जेथून निघालो होतो तो हा आपल्याच गावचा किनारा आहे.' तेव्हा तिसरा म्हणाला, 'अरे जरा ध्यानपूर्वक पहा, मग कळेल खरं काय ते.' पाहिलं तर काय? होडीची खिळ्याला बांधलेली दोरी सोडलीच नव्हती. अशाप्रकारे खिळ्याला बांधलेली होडी जागच्या जागीच होती. फक्त पाण्यात वल्ही मारली गेली म्हणजेच कर्म करायचं ते केलं, परंतु अंधारात खिळ्याला बांधलेली होडीची दोरी सोडायला विसरूनच गेले. तिघांना वाटलं की, आपण किनाऱ्याजवळ आलो आहोत परंतु ते जागच्या जागीच होते. तात्पर्य काय तर **ज्ञानाच्या प्रकाशाशिवाय जी कर्म केली जातात, ती ओझी वाहून नेण्यासारखी आहेत.**

* विवेक आणि बोध हीच ज्ञानाची समज आहे. ज्याच्याजवळ समर्पित भाव, अकर्ता भाव आहे; तो वास्तविकतेला मोठेपणा देतो. जी कल्याणकारी वचनं असतात, त्यांनाच मौल्यवान म्हटलं गेलेलं आहे. एखाद्याचे मन दुखविण्यासाठी कटू किंवा वायफळ शब्दांचा वापर केला जातो. त्याबद्दल कबीरजी म्हणतात, **'ये तो बकबक-झकझक करना जान।'** कोणी वटवट करत आहे, तर कोणी बडबड करत आहे. अशाप्रकारे या शब्दांना वटवट-बडबड म्हटले आहे. अशी ही कर्म विचारपूर्वक आणि समजूतदारपणे केली जात नाहीत म्हणजेच ज्ञानप्रकाशाच्या विपरीत केली जातात, त्यांचं काहीही महत्त्व नसतं.

तसे म्हटले आहे **'नीर बिओले माखन टोले अकल कहाँ है खोई?'** म्हणजेच काय, तर पाणी घुसळत राहायचं आणि दही मिळेल ही इच्छा बाळगायची. मग त्यासाठी एक दिवस काय, एक आठवडा काय, एक महिना काय, एक वर्ष काय? आयुष्य गेले तरी दही मिळणार नाही. याप्रमाणेच ज्ञानाशिवाय जी कर्म केली जातात, वास्तविक ती फक्त पाणी घुसळण्यासमान आहेत. त्यापासून आपल्याला काहीही प्राप्त होणार नाही. परमात्म्याचा बोध व्हावा, जन्म-मृत्यूच्या चक्रातून सुटका व्हावी म्हणजेच आपले अंतिम ध्येय गाठण्यासाठी अनेक प्रकारची कर्म केली जातात. परंतु जोपर्यंत गुरूची कृपा होत नाही, जोपर्यंत ज्ञानरूपी उजेड मिळत नाही तोपर्यंत पैलतीरी जाणे शक्य नाही. म्हणून भक्त, महापुरुष, संतजन, गुरू, पीर, पैगंबरांचे संदेश याच गोष्टीकडे इशारा करत आले आहेत की, ज्ञानाविना केलेली कर्म फक्त पाणी घुसळण्यासारखी आहेत. शहनशाह बाबा अवतारसिंहजी महाराज वरील पदातून जेथे संसाराबाबत ध्यान देण्यास सांगत आहेत तेथेच कोणत्या पद्धतीने एका परमात्म्याची प्राप्ती आणि मोक्ष (मुक्ती) प्राप्त करावा याकडे इशारा करत आहेत. या जगात जगताना, संसारात वावरताना आमची प्रवृत्ती कशी असावी याकडे इशारा करत आहेत. दोन्ही गोष्टींचा गांभिर्यपूर्वक विचार केला तर आपला उद्धार आणि कल्याण कुठे लपले आहे, हे ध्यानात येईल.

आत्मज्ञान मंथन उत्तरे

१) ब,	२) ड,	३) अ,	४) क,
५) अ,	६) क,	७) ब,	८) ड,
९) अ,	१०) ब,	११) क,	१२) ड,
१३) ब,	१४) ड,	१५) अ,	१६) क,

प्रेमानेच भक्ताची ओळख

पंडीत तोची भला। नित्य भजे जो विठ्ठला।।
अवघे समब्रह्म पाहे। सर्वाभूती विठ्ठल आहे।।
रिता नाही कोठे ठाव। सर्वाभूती वासुदेव।।
तुका म्हणे तोची दास।त्या देखिल्या जातीदोष ।।

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज वरील अभंगात प्रेमी भक्तांचीच व्याख्या सांगतात की, जो सर्वांमध्ये विठ्ठलाचे रूप पहातो, तोच सर्वांवर प्रेम करतो, तोच खरा पंडित आहे. त्याचीच भक्तामध्ये गणना होते. या चराचर सृष्टीत अशी कोणतीही जागा रिकामी नाही की तेथे वासुदेव नाही! सर्वच चराचर सृष्टीतील प्रत्येक जीवात वासुदेव आहे असे जो भक्त पहातो तोच खरा दास होतो आणि तो कोणाचीही जाती पाती विषयी घृणा नफरत करीत नाही. असे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज सांगून गेले आणि त्यांनीच ही प्रमाणं करून ठेवली.

हे चराचर जगत या निराकार परमात्म्याची रचना आहे. एखादा कलाकार एखादी कलाकृती जशी तयार करतो तशा प्रकारची ही रचना! परमात्म्याची विशेष कृती मनुष्य आहे. माणसाला परमात्म्याने आपलं रूप दिलं आहे. मानवमात्राशी प्रेम करणं हीच ईश्वरीय इच्छा असणं स्वाभाविक आहे. एकमेकांवर प्रेम करणे हीच शिकवण सर्व संत महात्म्यांनी सतयुगापासून ते आज वर्तमान कलियुगापर्यंत दिली आहे आणि वर्तमान समयाचे सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज सुद्धा आज पृथ्वीतलावर अहोरात्र देश-विदेशात जाऊन हीच प्रेमाची भाषा प्रत्येक मानवमात्रापर्यंत पोहचवित आहेत. प्रेमानेच भक्ताची ओळख होऊ शकते. प्रेम नसेल तर त्या भक्तीत काहीही अर्थ नाही. युगपुरुष अवतारसिंहजी महाराजांनीसुद्धा अवतार वाणीत सांगितले आहे की,

पाहिल्याविना मन ना मानी
मानिल्याविना प्रेम नसे।
गुरु दाखवि गुरू समजावी
गुरुच प्रेम खरे शिकवी।
गुरुवीना भक्ती करू जाता
पश्चात्ताप तया होई।
पूर्ण गुरुला शरण येऊनी
ओळख भगवंताची करी।
अवतार म्हणे कृपा दृष्टी
गुरुची जीवनाचे कल्याण करी।

अ. वा. पद. ७८

जो मनुष्य नामहीन आहे, ज्याच्यात प्रेमाचं अमृत नाही, त्या माणसाकडून शीतलता अथवा आनंद कधीही प्राप्त होत नाही. प्रेमभावासाठी या निराकार प्रभूशी नातं जोडावं लागेल. जीवनात प्रेमाचा उदय तेव्हाच होईल जेव्हा प्रत्येक मनुष्य या ईश्वर, परब्रह्म निराकाराशी जोडला जाईल. संत महात्मा सदैव मायेशी नव्हे तर प्रभुपरमात्म्याशी प्रेम करतात. मी, माझं ममत्व, मन समर्पित करावं लागत असतं. जोवर मी माझ्याच्या ममत्व अहंकारात तो पडलेला आहे तोवर त्याला काही प्राप्त होऊ शकत नाही. जेव्हा 'मी' हा 'तू'मध्ये परावर्तीत होतो तेव्हा मग त्याला काही प्राप्त करणे शिल्लक राहात नाही. तेव्हा चहूकडे प्रभूच दिसू लागतो. ज्ञान, ध्यान, पाठ, पूजा, प्रेमाविना सगळे सुने आहे. प्रभू प्रेमीच सर्वात श्रेष्ठ भक्त आहेत. संत कबीर दासांनी म्हटलेच आहे.

पोथी पढ पढ जग मुआ पन्डीत भया न कोय।
ढाई अक्षर प्रेम का पढे सो पन्डीत होय।।

आमच्या मनात प्रेम जर जागृतच झाले नाही, तर या हरिच्या दरबारात आम्हाला परवानगी नाही. भले आम्ही सकाळी पहाटे उठून स्नान करणारे असो, चंदन लावणारे असो, माळेची जप करणारे असो, दान पुण्य करणारे असो. एकीकडे काही कर्म करताहेत दुसरीकडे एकाला ठोकरत आहेत. मग प्रेम कोठे गेलं? माळा, टोपी, टिळे, ज्ञान, ध्यान काय कामाचे? आम्ही प्रत्येक वर्षी रावणाचा पुतळा जाळतो. त्याच्यावर आम्ही श्रद्धा का ठेवीत नाही? तो सुद्धा वेदशास्त्राचा ज्ञाता होता. जर हीच अट असती तर वेदशास्त्राला जाणल्याने कोणीही पंडित झाला असता. मगे रावणाचंही कल्याण व्हायला पाहिजे होतं. वेदशास्त्राला जाणूनही त्याने जर अभिमान केला, मर्यादेचा भंग केला तर तो प्रेमी भक्त होऊच शकत नाही, पंडित होऊ शकत नाही किंवा ज्ञानीही म्हणवू शकत नाही. प्रेम तर मनाचा सौदा आहे.

प्रेमाचा संबंध तेव्हाच बनतो, जेव्हा प्रेमाची भावना हृदयात असेल.

यासाठी आपण अंर्तमनाच्या गाभाऱ्यात ही गोष्ट बसवायला हवी की, प्रभू परमात्म्याला प्रसन्न करायचे असेल तर त्याच्या भक्तावर प्रेम करावेच लागेल, मग ते भक्त कोणतीही भाषा बोलणारे असोत, कोणत्याही प्रांतातले असोत, त्यांचे कपडेलत्ते भले कोणत्याही रंगाचे असोत, ते कोणत्याही देशात राहाणारे असोत; त्यालाच संतभक्त म्हणता येईल. पुरातन काळात पण संत महात्म्यांची हीच शिकवण होती आणि आजही तीच आहे. भगवान येशू म्हणत की, हे माणसा! हे जितके भक्त आहेत हे माझंच रूप आहे. यांच्यामध्ये कोणालाही धिक्कारलं तर तू मला धिक्कारलंस. जर यांच्यापैकी कुणालाही तहानेनं जरी मारलंस तर तू मला तहानेने मारण्याचा प्रयत्न केलास आणि जर यांच्यावर प्रेम केलं तर माझ्यावर प्रेम केलं असे होईल. प्रेम भक्ती केवळ अर्पण भावाचं नाव आहे. तन मन धनाने जो या निराकार प्रभू परमात्म्याला स्वत:ला अर्पण करून टाकतो आणि त्याच्या नामात हरपतो तोच खरा प्रेमी भक्त होतो. जसे आईचे लेकरावर प्रेम, गाईचं वासरावर प्रेम, मातेचं सहज प्रेम आपल्या मुलावर असतं. ती त्या लेकराचं पालन पोषण आणि रात्ररात्र जागून त्यांचे संगोपन करीत असते. ती जे मुलावर प्रेम करते ते काही स्वार्थापोटी करीत नाही की हे मूल मोठे झाल्यावर आपल्या नावाने बँकेत मोठमोठे अकाऊंटस् उघडणार आहे, या लालसेपोटी आई कधीही आपल्या मुलावर प्रेम करीत नाही. तर तिचे प्रेम बाळावर विशुद्ध असते. आईच्या रोमारोमात, श्वासा श्वासात हे प्रेम साठलेले असते. अशाच रितीने भक्त आणि भगवंताचे प्रेम असते.

प्रेमाची इमारत ज्ञानाच्या पायावर टिकते. या नामाचा निवास भक्ताच्या हृदयात होणं आवश्यक आहे. ज्याच्या मनात या हरिचा निवास आहे, त्या भक्ताच्या हृदयातून नेहमी प्रेमच वाहात रहातं आणि जे रिक्त रिकामे आहेत ते प्रेमावाचून रिकामेच आहेत. जसे एखादे तळे आहे पण त्यामध्ये पाणी नाही त्या तळ्यात एखाद्याने पाणी समजून उडी मारली तर त्याची शारीरिक हानी झाल्याशिवाय रहाणार नाही. अशा तऱ्हेने या नामरूपी पाण्याशिवाय कुणाशीही नातं जोडलं तर त्याचे परिणामही तसेच होतील हे निश्चित. प्रेमाचा आदर्श प्रतिपादन करताना महात्मा सांगतात-

ज्यो जल प्यारा माछरी, लोभी प्यारा दाम।
माता प्यारा बारका, भक्त प्यारे राम।।

जसे संत कबीरांनी प्रेमाचं उदाहरण दिले की, माशाला पाणी प्रिय, लोभ्याला धन प्रिय, मातेला आपली मुलं प्यारी आणि भक्ताला भगवंत प्रिय असतो. माशाचा पाण्याशी संबंध आहे, प्रत्येकाला माहीत आहे. जर त्याला पाण्यापासून वेगळं केलं गेलं तर मासा तडफडून मरून जातो. भक्ताचीही अशीच अवस्था होते म्हणजेच भक्त या प्रभूपरमात्म्यापासून जर वेगळा झाला तर त्याच्या स्मरणाचे विस्मरण होते, खंडण होते आणि माशाप्रमाणेच त्या भक्ताची गत होते. तेव्हा या मनाला प्रभू परमात्म्याशी जोडून ठेवले पाहिजे व उठता बसता, खाता - पिता, चालता - फिरता या प्रभूचं ध्यान केलं पाहिजे. भक्तांनी या दातारला नेहमी स्मरलं पाहिजे, पावलो पावली याची जाणीव ठेवली पाहिजे. जीवनासाठी श्वास जितका आवश्यक आहे, त्याचप्रकारे या निराकार प्रभूची जाणीवही आवश्यक आहे. म्हणून अशाच भक्ताची ओळख प्रेमीभक्त म्हणून होत असते. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, संत कबीर, संत नामदेव, संत एकनाथ महाराज, मिराबाई, रविदास, भक्त शबरी असे कितीतरी संत होऊन गेले, त्यांच्या जीवनात हाच समर्पण भाव होता. प्रेम होतं. दुसऱ्याला सुख देण्यातच ते आनंद मानत होते. म्हणूनच ते आज अमर झाले. या वर्तमान समयी या घोर कलियुगात समयाचे सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज आज विद्यमान असून ते अहोरात्र गावखेड्यापासून ते देशविदेशात जाऊन हाच मोलाचा संदेश प्रत्येक मानवापर्यंत पोहचविण्याची मोलाची कामगिरी करीत आहेत आणि ते हीच शिकवण देतात की माणसा तू माणूस बन आणि या निराकाराला ओळखून आपल्या जीवनाचे सार्थक कर.

- श्री. कोंडाजी दे. भागवत
मु. बावपठार, ता. संगमनेर, जि. अहमदनगर

ज्ञानदृष्टी

ज्ञानांजन घालून सद्गुरूंनी ज्ञानदृष्टी मज दिली आहे
आता मी फक्त मानव आहे मानवता माझा धर्म आहे ।।धृ।।

ना हिंदू ना सिख इसाई ना मी मुसलमान आहे
ना मी मोठा ना मी छोटा ना गरीब ना श्रीमंत आहे
नाशिवंत शरीरामाजी मी अविनाशीचा अंश आहे ।।१।।

प्रत्येक युगात प्रत्येक रूपात रहस्य हा खोलत आहे
मानव हा मायेच्या आहारी जाऊन धोका खात आहे
ना जपाची ना तपाची ना कर्मकांडाची गरज आहे.
जो सद्गुरूच्या चरणी आला सुखी जगी या तो आहे. ।।२।।

संकलांसाठी संधी सोनेरी. समयाचा सद्गुरू आला आहे
संसार सारा सुखी व्हावा. हीच गुरूचरणी प्रार्थना आहे
ज्यांनी ओळखिले या हरीला सदैव तोच सुखी आहे
उघडून पहा अवतार वाणी अनमोल त्यात हे काव्य आहे ।।३।।

नर पूजा नारायण पूजा गुरू वाक्य अनमोल आहे
मानवतेची सेवा आता हेच माझे ध्येय आहे
यासाठी सद्गुरू कृपेची नितांत अशी गरज आहे
सद्गुरू कृपा असो प्रविणवर हीच एक मनिषा आहे ।।४।।

- श्री. प्रविण राजाराम बच्छाव,
मु. पो. सोनज, ता. मालेगांव, जि. नाशिक.

तू सत्य ईश्वरा

हे गण नायका, मज वर दायका।
निराकारा 'तू सत्य ईश्वरा' ।।धृ.।।
साकार होशी भक्ता तारीशी
नर नारीचे रक्षण करीशी,
तुझ्या कृपेचा मिळे आसरा
निराकारा तू सत्य ईश्वरा ।।१।।
तूच व्यापिले तिन्ही ताळ।
स्वर्ग, मृत्यू, देवा आणि पाताळ
तुझा असे धाक या चराचरा
निराकारा तू सत्य ईश्वरा ।।२।।
चारी वेद तुलाच गाती
सहा शास्त्र ही तुझी साक्ष देती
वंदन नामा करी दातारा
निराकारा तू सत्य ईश्वरा ।।३।।

- श्री. नामदेव खरात (शेंदूरजणे, वाई)

चरणी येऊनी पाहावं

सद्गुरू माझा देवांचा देव
यांच्या चरणी येऊनी पहावं
याने दाविला निर्गुण देव ।।धृ।।
कोणी असो गरीब धनवान
कोणी असो वैश्य ब्राह्मण
सर्वांघटी जागविला हा देव
यांच्या चरणी येऊनी पहावं, याने ।।१।।
मिराबाईच्या विषाचं केलं अमृत
जनाबाईचं याने ओढीलं जातं
भक्तासाठी हा घेतसे धाव
यांच्या चरणी येऊनी पहावं, याने ।।२।।
सद्गुरूचा महिमा आहे अपार
निर्गुणाचे रूप आहे साकार
निर्गुण सगुण रूप भजावं
यांच्या चरणी येऊनी पहावं, याने ।।३।।
दासी 'हिराबाई' चा धरूनी हात
आत्म्या-परमात्म्याचं जोडीलं नातं
तुझे नाम माझ्या हृदयी रहावं
यांच्या चरणी येऊनी पहावं, याने ...।।४।।

श्रीमती हिराबाई पवार,
मोरबाग रोड, दादर (पू) मुंबई १४.

मानवरूपी ज्ञानदीपहीच काळाची गरज

आज समाजात प्रत्येक मानव ईश्वराविषयी श्रद्धाभाव जोपासतो. जोपासना म्हणजे पालन करणे. कारण रूढी परंपरा व पूर्वापार चालत आलेली आपल्या समाजाची परंपरा खंडीत न होता चालत राहावी. याच हेतूने ती पणजोबा, आजोबा, आईवडील यांनी जे भक्तीच्या नावाखाली केले त्याच कर्माचे आचरण मी सुद्धा करतो.

परंतु आज समाजात भक्तीच्या नावाखाली भक्तीचे मूळ रहस्य जाणून न घेता केवळ पूजापाठ, जपतप, इत्यादी कर्मकांडेच केली जातात. परंतु प्रचलित कर्मकांडं ही त्या मागील हेतू जाणूनच केली पाहिजेत.

जसे, आपल्याकडे दिवाळी सण सुरू झाला की घराच्या आत-बाहेर इलेक्ट्रिक वस्तूंची रोषणाई, मातीच्या पणत्या,दिव्यांची सजावट, गावोगावी दारोदारी मातीच्या दिव्यांच्या रोमहर्षक तेजोमय प्रकाशाने आसमंत उजळून निघतो. परंतु माणसाने थोडा विचार केला तर त्याला कळून येईल की त्यामुळे केवळ चार दिवस घटकाभर क्षणिक आनंद सुख मिळेल, परंतु शाश्वत सुख मिळू शकत नाही.

समाजात मानव भक्तीच्या नावाखाली देवासमोर मातीचा किंवा धातूचा दिवा लावतो. मग त्या दिव्यात असणारे तेल, कापसाची वात या वस्तू कुठून आल्या ? कोणी निर्माण केल्या याचा विचार मानव कधी करतच नाही. कारण रीतिरिवाजाप्रमाणे पूर्वीपासून समाजात चालत आलेली परंपरा पाळणे हाच त्या मागचा हेतू. जर माणसाने थोडा सुज्ञपणे विचार केला तर त्याला कळेल की या तेलवातीच्या दिव्याने अंधार असेल तिथे प्रकाश पडेल, परंतु देव काही अंध नाही की त्याला प्रकाश दाखवायला पाहिजे. परमेश्वराने एवढा मोठा सूर्य निर्माण केला आहे तो त्याला प्रकाशित करू शकत नाही तर एवढासा दिवा म्हणजे तेलवातीच्या दिव्याचा प्रत्यक्ष देवाशी काहीही संबंध येत नाही. परंतु अज्ञानतेची झापड डोळ्यांवर आल्यामुळे ही माणसेच समाजात आंधळी झाली आहेत. समाजात माणसांचे आंधळेपण घालवण्यासाठी ज्ञान प्रकाशाचीच गरज आहे. कारण या तेलवातीच्या दिव्यावर आपण किती दिवस विसंबून राहायचे. कारण म्हटलं आहे की मागून आला पुढे चालला हीच प्रथा सगळीकडे बोकाळत आहे आणि हे कुठंतरी थांबलंच पाहिजे. त्यासाठी गरज आहे मानवरूपी ज्ञानदीपाची.

आता आपले मानवी शरीर हे सुद्धा पंचमहाभूतांपासून बनले आहे. ते सुद्धा मातीतूनच आले आहे. मग त्या शरीराला आपण दिव्याची उपमा देऊ व दया, क्षमा, शांती, प्रेम, नम्रता या अहिंसक गोष्टींचे तेल घालू व कापूसरूपी ज्ञानाची ज्योत अखेरच्या श्वासापर्यंत तेवत ठेवून संपूर्ण मानव समाजाला या अज्ञानरूपी काळोख्या रात्रीतून ज्ञानरूपी प्रकाशाकडे नेऊ. तेव्हाच खऱ्या अर्थाने जीवनात आनंद मिळेल म्हणजे त्या ज्ञानरुपी दिव्याचं जळणं आपल्यासुद्धा प्रत्यक्षात जीवनात उतरवता येतं.

विझलेले हजारो दिवे आहेत, पण त्यांना काहीही महत्व नाही. परंतु तेवत राहणाऱ्या एका दिव्याच्या प्रकाश क्षेत्रात अंधाराची प्रवेश करण्याची हिम्मत होणार नाही.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटलं आहे की

दूरितांचे तिमिर जावो ।
विश्व स्वधर्म सूर्ये पाहो । (पसायदान)

(पुढील मजकूर पान क्र. ४० वर)

वाचकांचे मनोगत

अगदी डोळे दिपवून टाकणारा 'संत निरंकारी (मराठी) पत्रिका मार्च २००९' चा अप्रतिम अंक पाहून मन अक्षरशः भरून आले. संत निरंकारी मराठी मासिकाच्या ४४ वर्षांच्या वाटचालीत पहिल्यांदाच इतका शोभिवंत अंक पाहिला, की वर्णन करण्यास शब्दच अपुरे पडतील. एकेक पान उलगडताना संत समागमचा आत्मानंदच जणू लुटल्यासारखे वाटत होते. इंद्रधनुष्याच्या सप्तरंगांना मागे सारणाऱ्या या ४८ पानी विविध व आकर्षक अशा रंगसंगतीने सजलेल्या मासिकाने कोणतेही नाव ठेवण्यास जागाच शिल्लक ठेवली नाही. संपादक आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या या कौतुकास्पद सेवाकार्याबद्दल हार्दिक अभिनंदन! मासिकाच्या माध्यमातून सदैव असाच 'आध्यात्मिक प्रसाद' मिळत राहो आणि या मराठी मासिकाची उत्तरोत्तर उन्नती होत राहो, हीच सद्गुरूचरणी मन:पूर्वक प्रार्थना!

- श्री. गंगाधर गजानन विचारे, (प्रभारी, चिपळूण क्षेत्र)

मार्च २००९ चे संत निरंकारी (मराठी) मासिक मिळाले. प्रथम संपूर्ण मासिक चाळून पाहिले, तर ४२व्या महाराष्ट्र संत समागमाच्या चारही दिवसांची झळक पाहायला मिळाली. मासिक वाचून एवढा आनंद झाला की, त्याचे वर्णनही करू शकत नाही. ४२व्या समागममध्ये दास प्रकाशन विभागात सेवेला होता. सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत सेवा असल्याने प्रकाशनमध्ये सेवा करणारे आम्ही सर्व महापुरुष समागमचा फारसा आनंद घेऊ शकलो नाही. मासिकात सद्गुरू बाबाजी, राजमाताजी, पूज्य माताजी यांचे फोटो, तसेच शोभायात्रा, सेवादल रॅली, गुरूवंदना, कवीदरबार व इतर महात्म्यांचे गीत-विचार सचित्र छापल्याने समागम सेवेमुळे जो आनंद घेऊ शकलो नाही, तो हे मासिक पाहून मिळाला. असे वाटत होते की, जणू आपण प्रत्यक्ष समागमच पाहात आहोत. गावोगावी असे कितीतरी महापुरुष व माता-भगिनी आहेत, जे संत समागमला पोहचू शकत नाहीत. त्यांना सद्गुरूचा आशीर्वाद प्राप्त होतोही, परंतु मासिकाच्या माध्यमातून समागमची सचित्र माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली, तर त्यांचा आनंद खरोखरच द्विगुणित होईल. तसेच जे नवीन जिज्ञासू समागमला पोहचू शकत नाहीत, त्यांना निदान असे मासिक वाचून आध्यात्मिक ज्ञानाचा खजिना तरी मिळेल.

- श्री. अशोक पवार (कल्याण, जि. ठाणे)

संपादक मंडळाचे कोणत्या प्रकारे अभिनंदन करावे हेच कळेनासे झाले आहे. मार्च २००९ चे मराठी मासिक हाती पडले आणि ज्यावेळी ते वाचू लागलो तेव्हा दास मासिक वाचत आहे की संत समागममध्ये आहे, हेच कळत नव्हते. जणू संत समागमचा आनंद उपभोगत होतो, असा भास होत होता. ज्यांना समागमला येण्यास मिळाले नाही, त्यांना हे मासिक वाचून समागमात असल्याचा आनंद वाटला असेल. याबद्दल किती धन्यवाद व्यक्त करावेत हेच कळत नाही. यासाठी सद्गुरूचरणी दास प्रार्थना करत आहे की, अशाच निरनिराळ्या प्रयोगाद्वारे मिशनच्या प्रचार-प्रसाराचे सामर्थ्य मराठी पत्रिका विभागाला लाभू दे.

- श्री. शंकर धोंडीबा पवार (भाईंदर, जि. ठाणे)

संत निरंकारी (मराठी) मासिक मार्च २००९ चा सर्वोत्कृष्ट अंक वाचला. सदर मासिकात ४२व्या महाराष्ट्र संत समागमची मनोवेधक सचित्र दृश्य प्रकाशित केल्याने दासच काय, तर संपूर्ण वाचक वर्ग संत समागमच्या ज्ञानगंगेत न्हाऊन निघाला आहे. सदर मासिकात सत्संग, शोभायात्रा, सेवादल रॅली, प्रबंधकीय विशेष सभा, गुरूवंदना, सामुदायिक विवाह, गुरुवचनामृत, कवी संमेलन, महापुरुषांचे गीत-विचार यांचे जिवंत चित्रीकरण पाहावयास आणि वाचावयास मिळाले. अशाच प्रकारचा आध्यात्मिक आहार सदैव मिळत राहो. मराठी पत्रिकेच्या या गुरुकार्यास हार्दिक शुभेच्छा!

- श्री. सुनील नांदोडे (जालना)

मार्च २००९ ची संत निरंकारी (मराठी) मासिक पत्रिका पाहून आणि वाचून अक्षरशः डोळ्यांचे पारणेच फिटले. त्यावेळी सहजपणे मुखातून शब्द उमटले की, 'काय वर्णू मी या संपादक मंडळाचे उपकार, वाचक जनास निरंतर जागविती' राजहंस पक्षी ज्याप्रमाणे दुधातील पाणी वेगळे करुन अमृतमय दूध समोर ठेवतो, त्याप्रमाणेच तीन दिवसीय ४२व्या संत समागमाचा सचित्र अमृतकुंभच जणू आमच्या समोर ठेवला. संत महात्म्यांचे तीन दिवसांचे सचित्र विचार, कवी-दरबार आणि सद्गुरू देवांची अमृतवाणी ज्या पद्धतीने प्रकाशित केली आहे, ते सर्व काही पाहून मन अगदी भरून येतं. अशीच विचाररूपी अमृतधारा संत निरंकारी (मराठी) मासिकातून बरसत राहावी आणि मराठी मासिकाची दिवसेंदिवस उन्नती व्हावी हीच सद्गुरूचरणी विनम्र प्रार्थना. (श्री. विठ्ठल कृष्णा खोत, बिळाशी-सांगली)

माहे एप्रिल २००९ ची संत निरंकारी (मराठी) पत्रिका अतिशय आवडली. मासिकाचे मुखपृष्ठ, ज्यावर सद्गुरू बाबाजींचे मनमोहक छायाचित्र पाहून मन प्रसन्न होते आणि 'होईल आपुलीशी जेणे सृष्टी ऐसी बनवा प्रेमळ दृष्टी' हा सुविचार अंतर्मनाला बरेच काही सांगून जातो. बाबा गुरबचनसिंहजी यांच्या जीवनावरील दोन लेख तसेच मानवता आणि मानव एकता विषयासंबंधित भारदस्त लेखांनी ओतप्रोत भरलेला हा अंक पाहून खरोखर भारावून गेलो. ''मानव बनूनी मानवतेचे कर्तव्य आपण निभावूया' ही श्री. बाळकृष्ण कासार यांची कविता अप्रतिम व सदाबहार आहे. (श्री. बादशहा जमालसो शेख, विरवडे-सोलापूर)

माहे मार्च २००९ चा संत निरंकारी मराठी मासिकाचा ४२ व्या महाराष्ट्र संत समागमावर आधारित सर्वांगसुंदर अंक प्रकाशित केल्याबद्दल श्री. विजय दत्ताराम सातार्डेकर (कुडाळ-सिंधुदुर्ग), श्री. संतोष निंबाळकर (इंदापूर-पुणे), श्री. लहू पडवळ (कांजूरमार्ग, मुंबई), श्री. तुकाराम विष्णु देसाई (घाटकोपर-मुंबई) इत्यादी महात्म्यांनी दूरध्वनीद्वारे आपले मनोगत व्यक्त करून मराठी पत्रिका विभागाचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

(पान ३८ वरुन)

मानवरूपी ज्ञानदीप-काळाची गरज

आज समाजात प्रत्येक मानवाच्या जीवनातील अज्ञान अंधार नाहिसा करण्यासाठी, घालवण्यासाठी गरज आहे ती मानवरूपी ज्ञानदीपाची. ज्ञानदीपाचा प्रकाश प्रत्येक मानवाच्या जीवनात पडल्यानंतरच विश्वातील प्रत्येक मानवाला स्वधर्म सूर्याची ओळख होईल.

ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटलं आहे की

लोपले ज्ञान जगी ।
हीत नेणती कोण ।।

आजच्या घडीला समाजात देवाधर्माच्या नावाखाली कर्मकांड वाढत आहे व अज्ञान अंधकाराच्या आवरणाने ज्ञान झाकले जात आहे, लुप्त होत आहे. कोणीही कोणाचा विचार करेनासा झाला आहे. समाजात अज्ञानरूपी अंधाराचे माजलेलं जंगल तोडण्यासाठी ज्ञानरूपी वृक्षाचे बीज पुन्हा पेरण्यासाठी आजच्या घडीला प्रत्येकाने मानवतेचा ज्ञानदीप बनणे अत्यंत गरजेचे आहे.

आज या वर्तमान युगात मानवतेचा ज्ञानदीप, मानवतेचा दीपस्तंभ, मानवतेचा पुजारी, समयाचे सद्गुरू निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज मानव कल्याणार्थ ज्ञानाची मशाल विश्वभर फिरवत आहेत.

सद्गुरू कृपेने त्या ज्ञानाचा प्रकाश आपल्याला मिळाला आहे. त्याची किरणे घराघरात प्रत्येक मानवापर्यंत पोहचवणे प्रत्येक ब्रह्मज्ञानीचे कर्तव्य आहे. कारण अज्ञानात जीवन जगणे हे पाप आहे व ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर इतरांना त्या अज्ञानातून बाहेर काढणे हे प्रत्येक ब्रह्मज्ञानी महापुरुषाचं नैतिक कर्तव्य आहे. जसं म्हटलं आहे की-

नाचू कीर्तनाच्या रंगी । ज्ञानदीप लावू जगी

म्हणून संताचा हाच हेतू अंगी बाळगून प्रत्येक निरंकारी संताने या ज्ञानदीपाचा प्रकाश विश्वभर पोहचवण्यासाठी मानवतेचा ज्ञानदीप बनणे हीच काळाची गरज आहे.

कु. काशिनाथ परशुराम मांडवकर,
बीड खुर्द, खालापूर, रायगड

कुवेते येथे मानव एकता दिवसा निमित्त रक्तदान केल्यानंतर प्रसन्न मुद्रेत असलेले निरंकारी श्रध्दाळू

लंडन येथे झालेल्या सेवादल प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेले समर्पित सेवादार

साहा (हरियाणा) येथे निरंकारी मिशनचा सत्य संदेश ऐकण्यासाठी जमलेला विशाल मानव परिवार

RNI No. 59874/93
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001
on dated 8th of every month

Printed matter
Postal Regd No. MH/MR/EAST/91/2009-2011
W.P.P. Licence No. MR/TECH/WPP-53/EAST/2009-2011

नेपाळ समागम निमित्त आगमन प्रसंगी सद्गुरु बाबाजींचे स्वागत करताना स्थानिक श्रध्दालू

नेपाळच्या राष्ट्रीय संत समागमात (टीकापूर) सत्य, अहिंसा व बंधुत्वाचा संदेश देताना सद्गुरु बाबाजी, सोबत विराजमान निरंकारी राजमाताजी व पूज्य माताजी

संत समागमाला एकत्रित जमलेला विराट जनसमूह